www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



‘मोदी देशाचं नेतृत्व करत राहतील यात कन्फ्यूजन....
पान ६ वर

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



धोनीचा षटकार आणि एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी...
पान ४ वर

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ • वर्ष - ०२, • अंक १० • पृष्ठे- ०६ • ठाणे, रविवार, १२ मे २०२४ • RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 • रु.२/-

## ठाण्यात गृहमतदानाला सुरुवात; दिव्यांग आणि ८५ वर्षावरील नागरिकांना भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा

● ठाणे, यश सावंत :

दिव्यांग आणि ८५ वर्षावरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा आणि मतदानाचा टक्का वाढावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा उपलब्ध केली आहे. ज्या ज्येष्ठ आणि दिव्यांग व्यक्तींना आजारपणामुळे घराबाहेर पडता येत नाही, अशा व्यक्तींसाठी ही सुविधा असणार आहे. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यात ८५ वर्षावरील ६३४ आणि १०३ दिव्यांग नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला.




मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तसेच ८५ वर्षावरील नागरिकांना आणि दिव्यांग असलेल्या व्यक्तींना घर बसल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत प्रथमच गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यात या प्रक्रियेला ९ मे पासून सुरुवात झाली असून विधानसभा मतदारसंघ निहाय्य ही मतदान प्रक्रिया पार पडत आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघ आणि भिवंडी लोकसभा मतदार संघामध्ये ९ मे रोजी तर, कल्याण लोकसभा मतदार संघा मध्ये १० मे रोजी गृह मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानुसार, ठाणे लोकसभा मतदार संघात ८५ वर्षावरील २५६ आणि दिव्यांग ३७ तर, कल्याण लोकसभा मतदार संघात ८५ वर्षावरील २१५ आणि दिव्यांग ४४ आणि भिवंडी लोकसभा मतदार संघात १६३ आणि दिव्यांग २२ असे गृह मतदान पार पडले. यातही, काही नागरिक घरी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे मतदान अद्याप बाकी आहे. या नागरिकांचे मतदान १५ मे पर्यंत पूर्ण केले जाणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

४० टक्के अपंगत्व आणि ८५ वर्षावरील वृध्द यांच्याकरिता भारत निवडणूक आयोगामार्फत १२ डी नमुना अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्यापैकी प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, मंजूर अर्जांच्या यादीनुसार विधानसभानिहाय मतदारसंघाद्वारे ८५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या आणि दिव्यांग मतदारांच्या घरी जावून त्यांचे मतदान घेण्यात येत आहे. यासाठी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. हे अधिकारी मतदारांना मतदान प्रक्रिया समजावतात आणि बॅलेट पेपरच्या माध्यमातून त्यांच्या कडून मतदान करुन घेतले जाते. त्यांनी केलेले मतदान हे गौपनिय राहावे यासाठी ते सील बंद केले जाते, अशी माहिती सुत्रांनी दिली.

### थोडक्यात

#### मद्य घोटाळाप्रकरणी ‘ईडी’चे नवीन आरोपपत्र; के कविता यांच्याविरोधात आरोप निश्चित



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणाशी संबधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी नवीन आरोपपत्र दाखल केले. त्यामध्ये बीआरएसच्या आमदार आणि तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांची मुलगी के कविता यांचे नाव आरोपी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे अशी माहिती अधिकृत सूत्रधारांनी दिली.
पान २ वर

#### आचारसंहितेच्या फेऱ्यात अडकल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या, नवीन नियुक्त्यांनाही फटका



● नागपूर,सचिन कदम :

केंद्रीय निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी लोकसभा निवडणुकीची घोषणा केली. यासोबतच देशभराम आदर्श आचारसंहितेची अंमलबजाणी सुरू झाली. नागपूर जिल्ह्यात व विभागात १९ एप्रिल व पश्चिम विदर्भात २६ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पडले.
पान २ वर

## जूनपासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

### मुंबई विद्यापीठाने जारी केले आदेश

● मुंबई, दिगंबर जाधव :

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या (एनईपी) पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठात पदवी अभ्यासक्रमांसाठी अंतर्गत आणि बाह्य मूल्यांकन पद्धत सुरू होणार आहे. यानुसार 40-60 गुणांकन पॅटर्न निश्चित करण्यात आला असून याची अंमलबजावणी जूनपासून केली जाणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत 894 हून अधिक महाविद्यालयात या नव्या पॅटर्नची अंमलबजावणी केली जाणार आहे. या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांना आदेश जारी केले असल्याची




माहिती विद्यापीठाचे पुलसचिव डॉ. बळीराम गायकवाड यांनी दिली. पदवी अभ्यासक्रमाच्या या नव्या पॅटर्नमुळे आत्तापर्यंत सुमारे 100 गुणांची परीक्षा आणि त्यावर आधारीत मूल्यांकन होत असलेल्या कला, वाणिज्य पदवी अभ्यासक्रमांमध्ये या नव्या पॅटर्ननुसार बदल होतील. शिवाय या पदवीच्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उद्योग, व्यवसाय आदी क्षेत्रांतील असाईनमेंट, विषयाशी संबंधित कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव, ऑनजॉब ट्रेनिंग आदींचा यात समावेश असणार आहे.
पान २ वर

## पापडीतील पुरातन तलावात भराव टाकून पुल बांधण्याला पर्यावरणवाद्यांचा विरोध

● वसई, विशाल पाटील :

वसईच्या पापडी येथील पुरातन तलावात भराव टाकून पुल तयार केला जात असल्याने स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे पुलाच्या सौंदर्याला बाधा येऊन पुलाचे क्षेत्रफळ कमी होण्याची शक्यता आहे. एकीकडे तलावाचे संवर्धन करणे गरजेचे असताना दुसरीकडे तलावात पूल कशासाठी असा सवाल पर्यावरणवाद्यांनी केला आहे.

वसई पश्चिमेला पापडी येथे पुरातन तलाव आहे. हा तलाव सुमारे दिडशे वर्ष जुना आहे. मुख्य रस्त्याला लागून असलेला हा प्रशस्त तलाव पापडीची ओळख बनला आहे. काही वर्षांपूर्वी पालिकेने या तलावाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेतल्यानंतर तलावाचे क्षेत्रफळ कमी झाले होते. आता



पालिकेने तलावाच्या मध्यभागी भराव टाकून पूल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.या तलावाजवळ जुने हनुमान मंदिर आहे. रुस्ता रुंदीकरणात हे मंदिर तलावात स्थलांतरीत केले जाणार असल्याने पूल तयार केला जात आहे.
पान २ वर

## डीपीएस तलावप्रकरणी अहवाल द्या; केंद्रीय पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालयाने राज्य सरकारला दिले निर्देश

● नवी मुंबई, भावना जैन :

मागील काही महिन्यांपासून नेरुळ एनआरआय परिसरातील डीपीएस फ्लेमिंगो सरोवराचा नाश थांबवण्यासाठी नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केंद्राकडे विचारणा केली होती. त्याला प्रतिसाद देत केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने शुक्रवारी राज्याला या समस्येची तपासणी करून अहवाल देण्याचे निर्देश दिले आहेत.

सिडकोने नेरुळ येथील प्रवासी जलवाहतूक टर्मिनलच्या पर्यावरणीय मंजुरीमध्ये लादलेल्या अटींचे उल्लंघन केल्यामुळे फ्लेमिंगोंचा अधिवास असलेला तलाव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे आणि तेथील फ्लेमिंगोंचा मृत्यू होत असल्याकडे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केंद्राच्या



पर्यावरण व वन विभागाला कळवले होते.

सिडको नैसर्गिक आंतरभरतीच्या पाण्याच्या प्रवाहात अडथळा आणणार नाही, अशी एक अट होती. परंतु तलावाकडे जाणाऱ्या जलवाहिन्या गाडल्या गेल्या असून त्यामुळे आंतरभरतीचे पाणी तलावाकडे येण्याचा मार्ग बंद झाल्याने डीपीएस तलाव कोरडा पडला असून त्यामुळे मागील काही दुर्घटनांमध्ये १० फ्लेमिंगोंचा मृत्यू झाला तरी काही फ्लेमिंगो जखमी झाल्याचे पाहायला मिळाले होते. फ्लेमिंगोंच्या मृत्यूला सिडको जबबदार असून त्यांच्याच दुर्लक्षामुळे तलावात येणाऱ्या भरतीच्या पाण्याचा प्रवाह बंद झाल्यानेच फ्लेमिंगोंच्या दुर्घटनांचा घटनाक्रम सुरू झाला होता.

केंद्राच्या इम्पॅक्ट असेसमेंट विभागातील ईमेलने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला या समस्येचे परीक्षण करण्यास आणि तक्रारकर्त्याला तसेच मंत्रालयाला प्रतिसाद देण्यास सांगितले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा फ्लेमिंगोच्या अधिवासावरुन सिडकोच्या बोटचेप्या भूमिकेमुळे साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.
पान २ वर

## "माझ्या कुटुंबावरती हल्ला करण्याचा डाव रचला जातोय", मतदानापूर्वीच जरांगेंचा गंभीर आरोप



● जालना, नितीन देवळेकर :

लोकसभा निवडणुकीचा चौथा टप्पा पुढील काही तासांत सुरू होत असून प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मात्र, मराठा समाजाची तोफ म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्या मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केला आहे.

### मी कुठल्याच पक्षासोबत नाही

■ मी महाविकास आघाडी किंवा महायुती किंवा अपक्षा बरोबर नाही, मराठ्यांनी ज्याला पाडायचे त्याला पाडा. मात्र, त्याच्या पाच पिडया पुन्हा उभ्या राहिल्या नाही पाहिजे, असेही जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

यापूर्वी जरांगे यांनी पत्रकार परिषदेतून गंभीर आरोप केले होते. मला सलाईनमधून विष देऊन ठार मारण्याचा प्रयत्न होत असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. आता, माझ्या कुटुंबावरती हल्ला करण्याचा डाव रचला जातोय. सरकारला माझी निष्ठा विकत घेता येत नाही, म्हणून असा डाव चाललाय, अशी मला खबर मिळाल्याचे जरांगे यांनी म्हटलंय. जरांगे यांनी जालन्यातून संवाद साधताना हा गंभीर आरोप केला आहे. यावेळी, त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केलं. तर, बीडमधील जातीय राजकारणावरही परखडपणे भाष्य केलं.

भावनिक करुन मला मागे सरकवण्याचा काम होत आहे.
पान २ वर

## मातृत्व रजेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा, मुंबई उच्च न्यायालयाचा ‘एएआय’ला आदेश



● मुंबई, विशाल कारंडे :

‘आई होणे ही नैसर्गिक घटना आहे, त्यामुळे नोकरी देणाऱ्या मालकाने महिलांच्या बाबतीत मातृत्व रजा देताना सहानुभूतीपूर्वक व कनवाळूपणे विचार करायला हवा. आपल्या समाजाचा जवळपास अर्धा घटक हा महिलांचा आहे. या मोठ्या वर्गाचा सन्मान व्हायलाचा हवा आणि महिला उपजीविकेसाठी ज्याठिकाणी काम करतात तिथे त्यांना प्रतिष्ठेची वागणूक मिळायलाच हवी’, असे महत्त्वाचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय विमान प्राधिकरणातील (एएआय) महिला कर्मचारीच्या संदर्भातील निर्णयाच्या निमित्ताने केले आहे.

करुणा श्याम संदल यांना तिसऱ्या अपत्याच्या कारणामुळे मातृत्व रजा नाकारण्याचा केंद्र सरकारच्या अखत्यारितील ‘एएआयए’चा एक दशकापूर्वीचा निर्णयही न्या. अतुल चांदुरकर व न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने रद्दबातल केला. तसेच करुणा यांना आठ आठवड्यांच्या आत मातृत्व रजेचा लाभ मंजूर करण्याचा आदेशही एएआयला दिला. कनाकवली राजा अरमुगम (उर्फ करुणा संदल) यांचा के. राजा अरमुगम यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांना १८ जुलै १९९७ रोजी मूल झाले होते.
पान २ वर

## पुणे, शिरूर व मावळ मतदारसंघातील मतदानासाठी कलम १४४ लागू; 'या'बाबत आहे मनाई आदेश

● पुणे, अभिजित येरल्लू :

लोकसभेच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी प्रशासन सज्ज आहे. या तिसऱ्या टप्प्यातील लोकसभेचे पुणे, शिरूर व मावळ या मतदारसंघातील काही पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत आहे. निवडणुका सुरळीत, शांततेत पार पडण्यासाठी आयुक्तालयाच्या हद्दीत फौजदारी प्रक्रिया दंड संहिता (सीआरपीसी) कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश लागू केले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रांपासून ठराविक अंतरापर्यंत अनेक बाबींना निर्बंध असणार आहेत. हे आदेश मंगळवारी (दि. १४) रात्री बारा पर्यंत लागू असणार आहेत.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी याबाबतचे आदेश दिले. मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ नुसार कायदेशी कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद आहे. कायद्याचे उल्लंघन होईल, असे कोणतेही न करता नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे



आवाहन देखील पोलिस आयुक्त चौबे यांनी केले आहे.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रिसायडींग अधिकारी, निवडणूक कामकाज संदर्भाने नेमलेले शासकीय व्यक्ती, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले शासकीय व्यक्ती ज्यांना निवडणूक संदर्भाने संपर्क करणे आवश्यक आहे.
पान २ वर

## राज ठाकरे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ठाण्यात

● ठाणे,रोहित जैसवाल :



### आनंद आश्रमाला भेट देऊन, दिघे यांच्या प्रतिमेचे घेणार दर्शन

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे रविवारी ठाण्यात येणार आहेत. राज ठाकरे यांची कळवा येथील ९० फूट रोड परिसरात सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेपूर्वी ते शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या टेंभी नाका येथील आनंद आश्रमात आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेणार आहेत. आनंद दिघे हे राज ठाकरे यांच्या अत्यंत जवळचे मानले जात होते. राज ठाकरे ठाण्यात येत असल्याने मनसैनिकांबरोबरच महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे. तसेच दिघे यांचा खरा शिष्य कोण? या वादावर आता राज ठाकरे हे सभेतून पडदा टाकणार असल्याचा दावा शिवसेनेचे पदाधिकारी करत आहेत. शिवसेनेचे दिवंगत नेते ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे आणि राज ठाकरे यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. ठाणे लोकसभेसाठी शिवसेनेकडून नरेश मस्के तर कल्याण लोकसभेसाठी श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. काही दिवसांपूर्वी या दोन्ही उमेदवारांनी राज ठाकरे यांची भेट घेऊन सभा घेण्याची विनंती केली होती.
पान २ वर

## संपादकीय

# गोंधळलेले विरोधक

विरोधकांकडे काही कार्यक्रम नाही, त्यांच्याकडे देशास पुढे नेण्याचा विचार नाही, त्यांना फक्त सत्तेत रस आहे आणि ते गोंधळलेले आहेत. सबब आमचा पराभव होणे देशास मागे नेणारे असेल, आमच्या पराभवाने देशाच्या प्रतिस्पर्ध्यांस अधिक आनंद होईल आणि आम्हास बहुमत मिळाले नाही तर देश अराजकाच्या वाटेने जाईल इत्यादी विधाने सत्ताधारीच जेव्हा करू लागतात तेव्हा आपल्या पराभवाची चाहूल त्यांना लागलेली असते. इंग्लंडचे पंतप्रधान ऋषी सुनक यांस ती लागलेली असावी. अलीकडे झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत सुनक यांच्या हुजूर पक्षाने दणकून मार खाल्ला. त्याच्या जोडीने लंडनसह काही महत्त्वाच्या शहरांच्या महापौरपदाच्या निवडणुकांतही सुनक यांच्या पक्षाने सपाटून मार खाल्ला. त्या देशात महापौरपद हे आपल्यासारखे शोभेचे नसते. महापौर हा त्या त्या शहराचा मुख्यमंत्री असतो आणि शहराचे पोलिसांसह सर्व यंत्रणांवर त्याचे नियंत्रण असते. त्यामुळे महापौरपद हे तिकडे फार महत्त्वाचे. इंग्लंडातील जवळपास सर्व महत्त्वाच्या शहरांचे महापौरपद या निवडणुकांत मजूर पक्षाकडे गेले. लंडनच्या महापौरपदावर २०१६ पासून मजूर पक्षच ठाण मांडून आहे. तेथील महापौरपदी स्वपक्षीय नेता बसवण्यात पंतप्रधान सुनक यांसदेखील यश आले नाही. तथापि इतका मार खाल्ल्यानंतर आपले काही चुकले असेल, आपल्या ध्येयधोरणांतही काही सुधारणांची गरज असेल हे मान्य करण्यास हे सुनक तयार नाहीत. त्यांचे म्हणणे एकच. ते ज्या पक्षाचे नेतृत्व करीत आहेत त्या पक्षास पुन्हा सत्ता मिळाली नाही तर पार्लमेण्ट त्रिशंकू राहील, आघाडीचे सरकार येईल आणि देशाची वाटचाल अस्थिरतेकडे सुरू होईल. सुनक यांचे हे दावे तपासून पाहिल्यास काय दिसते?

ताज्या निवडणुकांत १०७ स्थानिक स्वराज्य संस्थांतील ४७८ नगरसेवक आदी पदे सुनक यांच्या हुजूर पक्षाने गमावली. त्याच वेळी मजूर पक्षाचे १८६, लिबरल डेमॉक्रॅट्सचे १०४ आणि पर्यावरणवादी 'ग्रीन' पक्षांचे ७४ नगरसेवक अधिक निवडून आले. तर ९३ जागांवर अपक्ष वा अन्य पक्षीय निवडून आले. तर मजूर पक्षाची मजल हजार जागांच्या पलीकडे गेली. 'स्काय न्यूज' वृत्तवाहिनीनुसार मजूर पक्षास या निवडणुकांत ३५ टक्के मते मिळाली तर सुनक यांच्या हुजूर पक्षाचा वाटा २६ टक्क्यांवरचा मर्यादित राहिला. लक्षणीय मते मिळवली ती लिबरल डेमॉक्रॅट्सनी. त्या पक्षाच्या पदरात १६ टक्के मते पडली. याचा अर्थ मतदारांचा कौल हा सत्ताधारी हुजूर पक्षाच्या विरोधात आहे, असे स्पष्ट दिसते. त्यातही जेव्हा ब्रिटिश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी होतात तेव्हा त्यातून वारे कोणत्या दिशेने वाहात याचा अंदाज निश्चित बांधता येतो. याआधी त्या देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या २०२१ साली. त्या वेळी पंतप्रधानपदी बोरिस जॉन्सन होते आणि करोनाकाळातील बेकायदा पार्ट्या प्रकरणी काही उजेडात आलेले नव्हते. त्या पार्ट्यांत जॉन्सन दोषी आढळले आणि नंतर त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्याआधी झालेल्या स्थानिक निवडणुकांत त्यांच्या हुजूर पक्षास ३९ टक्के इतकी मते पडली होती आणि त्या वेळी मजूर पक्षास ३० टक्के मतदारांचा पाठिंबा होता. लिबरल डेमॉक्रॅट्सना जेमतेम १३ टक्के मते मिळाली होती. त्या तुलनेत आताची मत टक्केवारी पुरेशी बोलकी म्हणायला हवी. सत्ताधारी हुजूर पक्षाच्या अंगणातील जवळपास १३ टक्के मतांची धूप या निवडणुकांत झाल्याचे स्पष्ट दिसते.

पण हे मान्य करणे ऋषी सुनक यांस जड जात असावे. तसे होणे साहजिक. कोणत्याही शीर्षस्थ नेत्यास आपल्या सत्ताकाळात स्वपक्षाचा ऱ्हास झाला हे मान्य होणारे नाही. तेव्हा नाव जरी ऋषी असले तरी हे सुनक काही भौतिक विकारांपासून दूर गेले असतील असे समजण्याचे काहीही कारण नाही. पण म्हणून आपल्याखेरीज जो कोणी सत्तेवर येईल तो इंग्लंडास भिक्षेस लावेल असा सूर लावणे अयोग्य. त्या देशात २०१० सालापासून हुजूर पक्ष सत्तेवर आहे. टोनी ब्लेअर आणि नंतर त्यांचेच अर्थमंत्री होते ते गॉर्डन ब्राऊन यांचे सरकार गेल्यानंतर सलग हुजूर पक्षाकडे सत्ता राहिली. त्याआधी जवळपास तितकीच वर्षे मजूर पक्षाने राज्य केले. टोनी ब्लेअर यांचा कार्यकाल सुरू झाला १९९७ साली. ते सलग तीन वेळा निवडून आले आणि पंतप्रधान झाले. परंतु त्याच्याआधी जवळपास २० वर्षे हा पक्ष सत्तेबाहेर होता. हॅरॉल्ड विल्सन आणि मधेच पंतप्रधान झालेले जॅम्स कॅलॅघन हे मजूर पक्षाचे सरकार १९७९ साली सत्ताच्युत झाले. याचा अर्थ असा की त्या देशात एका पक्षाहाती राज्य दिले की तेथील मतदार त्या पक्षास दिवे लावण्यासाठी पुरेसा अवधी देतात. त्याप्रमाणे गेली १४ वर्षे हुजुरांहाती सत्ता राहिली. डेव्हिड कॅमेरून यांच्या विजयाने २०१० साली मजूर पक्षाच्या सत्ताकाळास खीळ बसली.

## आजची चित्रोळी



भुईमूगाच्या या शेंगा पाहून
दात शिवशिवती खाण्याला !
दाणे भाजून कुटून गुळासवें
खावें शेंगदाण्याच्या लाडूला !

मुकुंद कुलकर्णी,
कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

## पान १ वरून

### पुणे, शिरूर व मावळ मतदारसंघातील मतदानासाठी कलम १४४ लागू; 'या'बाबत आहे मनाई आदेश

यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मोबाईल फोन, स्मार्ट फोन, वायरलेस किंवा संपर्क साधने वापरण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात तात्पुरत्या स्वरुपाचे पक्ष कार्यालय कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक आस्थापनेत किंवा किंवा अतिक्रमण करून उभारण्यास मनाई आहे. संरक्षण प्राप्त व्यक्तीना मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात सुरक्षा रक्षकासह प्रवेश करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर आतमध्ये इलेक्शन बुथ लावता येणार नाही. एका इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान बुथ असतील तरी देखील त्या इमारतीसाठी एका उमेदवाराला एकापेक्षा जास्त बुथ लावता येणार नाही.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर त्रिज्यामध्ये वाहन आणण्यास मनाई आहे. लाऊड स्पीकर, मेगाफोन, आरडाओरडा करणे, गोंधळ करणे, दुवर्तन करणे, अशा प्रकारास मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आहे. मतदान समाप्ती करीता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते वा प्रचार कार्यकर्ते त्यांना त्या मतदारसंघात थांबण्यास मनाई असेल.

मतदान समाप्ती करीता निर्धारीत केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने कोणतेही बल्क मेसेज पाठविण्यास मनाई असेल. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे शस्त्र / हत्यार बाळगण्यास मनाई आहे.

### मातृत्व रजेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा, मुंबई उच्च न्यायालयाचा 'एएआय'ला आदेश

मात्र, ६ डिसेंबर २००० रोजी अरमुगम यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या जागी २४ फेब्रुवारी २००४ रोजी कनाकवली यांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळाली. १ जुलै २००८ रोजी त्यांचे श्याम संदल यांच्यासोबत लग्न झाले. त्यानंतर त्या लग्नापासून करुणा यांना २७ जून २००९ रोजी पहिले व ३ सप्टेंबर २०१२ रोजी दुसरे अपत्य झाले. या दुसऱ्या (म्हणजे तिसऱ्या) अपत्याच्या वेळी त्यांनी मातृत्व रजेसाठी दोनदा अर्ज केले. मात्र, तिसरे अपत्य असल्याने त्या रजेसाठी पात्र नाही, असे म्हणत 'एएआय'च्या प्रशासनाने आपल्या २००३च्या नियमावलीप्रमाणे २८ जानेवारी २०१४ रोजी आणि ३१ मार्च २०१४ रोजी अर्ज फेटाळले. त्याविरोधात करुणा यांनी तसेच 'एअरपोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया वर्कर्स युनियन' या कर्मचाऱ्यांच्या संघटनेने एकत्रित याचिकेद्वारे २०१५मध्ये आव्हान दिले होते. याविषयीच्या अंतिम सुनावणीअंती खंडपीठाने शुक्रवारी आपला निर्णय देताना 'एएआय'चा निर्णय रद्दबातल केला.

### डीपीएस तलावप्रकरणी अहवाल द्या; केंद्रीय पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालयाचे राज्य सरकारला दिले निर्देश

केंद्राच्या इम्पॅक्ट असेसमेंट विभागातील ईमेलने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला या समस्येचे परीक्षण करण्यास आणि तक्रारकर्त्याला तसेच मंत्रालयाला प्रतिसाद देण्यास सांगितले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा फ्लेमिंगोच्या अधिवासावरुन सिडकोच्या बोटचेप्या भूमिकेमुळे साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य मॅन्ग्रोव्ह सेलच्या एका उच्चस्तरीय पथकाने काही दिवसापूर्वीच तलावाला भेट दिली होती. त्याबाबतचा सिडकोच्या दुर्लक्षपणाचा अहवाल दिला आहे. तसेच पशुसंवर्धन आणि पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता, आम्ही तलवातील सर्व 'चोक पॉइंट्स' काढून टाकण्याची आणि आंतरभरतीच्या पाण्याचा मुक्त प्रवाह सुनिश्चित करण्याची आतुरतेने वाट पाहत असल्याचे मत नवी मुंबई एन्वाहयन्मेंट प्रिझर्वेशन ग्रुपचे संदीप सरीन यांनी सांगितले.

### राज ठाकरे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ठाण्यात

त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत राज ठाकरे यांनी सभा घेणार असल्याचे जाहीर केले होते. रविवारी सायंकाळी कळवा येथील ९० फूट रोड परिसरात राज ठाकरे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेची तयारी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून सुरू झाली आहे.

### मद्य घोटाळाप्रकरणी 'ईडी'चे नवीन आरोपपत्र; के कविता यांच्याविरोधात आरोप निश्चित

'ईडी'ने कविता यांना १५ मार्च रोजी हैदराबादमधील त्यांच्या निवासस्थानातून अटक केली होती. त्यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींअंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली होती.

'ईडी'ने या प्रकरणात दाखल केलेले हे सातवे आरोपपत्र असून 'ईडी' आणि 'सीबीआय'शी संबंधित विशेष न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा १३ मे रोजी त्याची दखल घेण्याची शक्यता आहे. दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणात मद्य परवाने मिळवण्याच्या बदल्यात 'आप'ला १०० कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप असलेल्या दक्षिण गटाच्या कविता या महत्त्वाच्या सदस्य असल्याचा आरोप 'ईडी'ने ठेवला आहे. ''के कविता या दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याच्या मुख्य सूत्रधारांपैकी एक आणि लाभार्थी होत्या. कविता यांनी अरविंद केजरीवाल आणि तत्कालीन उत्पादनशुल्क मंत्री मनिष सिसोदिया यांच्याबरोबर व्यवहार ठरवला.'' त्या २९२.८० कोटींशी संबंधित गुन्ह्यांमध्ये सहभागी होत्या असा 'ईडी'चा दावा आहे.

### पापडीतील पुरातन तलावात भराव टाकून पुल बांधण्याला पर्यावरणवाद्यांचा विरोध

यामुळे स्थानिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तलावातून ये-जा करण्यासाठी आम्ही हा पूल बांधत आहोत. त्यासाठी सध्या माती भराव केला जात आहे. पूलाच्या कामाचे खोदकाम करण्यासाठी हा भराव करण्यात आला आहे. नंतर भराव काढला जाईल, असे पालिकेचे कार्यकारी अभियंता प्रकाश साटम यांनी सांगितले.

पाणथळ स्थळे (संवर्धन वव्यवस्थापन) नियम-२०१७ नुसार पाणथळ स्थळांच्या यादीमधील जलाशये व जलाशयांच्या परिसरात कायमस्वरूपी बांधकाम करता येत नाही. नागपूर येथील फुटाळा तलावाला पाणथळ स्थळाचा दर्जा दिला गेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नागपूर फुटाळा येथील तलावात बांधकाम करण्यावर बंदी घातली होती. पापडी तलाव पाणथळाचा दर्जा नसला तरी तो पुरातन तलाव आहे. त्यामुळे या निर्देशाच्या अनुषंगाने या तलावातही बांधकाम करू नये, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. तलावाच्या पलिकेड तयार होणाऱ्या गगनचुंबी इमारतीसाठी तर या पूलाचा घाट घातला जात नाही ना अशी शक्यताही त्यांनी वर्तवली आहे.

वसई मधील सर्व तलाव सुशोभीकरण व विकासच्या नावाखाली संपवून टाकले जात आहे, असा आरोप पर्यावरणवादी कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांनी केला आहे. वसईच्या गिरीज गावातील तलाव अशाप्रकारे नष्ट करण्यात आला आहे. नालासोपारा पूर्वेकडील धनिव येथील तलवातून चक्क मालवाहू रेल्वे साठी मोठे पिलर टाकून मार्गिका तयार केल्याचेही डाबरे यांनी सांगितले. तलावात पुल बनवावा अशी मागणी कुणी केली होती? या पुलाचा वापर प्रेमी युगूल, नशेबाज आणि भिक्षेकरी यांच्यासाठीच होईल असे वसईतील सामाजिक कार्यकर्ते शंकर बने यांनी सांगितले.

### "माझ्या कुटुंबावरती हल्ला करण्याचा डाव रचला जातोय", मतदानापूर्वीच जरांगेंचा गंभीर आरोप

माझ्या बलिदानाने गृहमंत्र्यांचे समाधान होत असेल तर मी बलिदान द्यायला आणि जेलमध्ये जायला देखील तयार आहे, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर जरागेंनी हल्लाबोल केला. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात मराठ्यांची निवडणुकीमध्ये भीती आहे, ती नसती तर बारामती वरुन अंतरवालीमध्ये हेलिकॉप्टर आलं नसतं, असे म्हणत मनोज जरांगे यांनी जय पवार यांच्या भेटीवर भाष्य केलं. कारण,बारामतीमधील निवडणुकांपूर्वीच जय पवार यांनी अंतरवालीत जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली होती. या भेटीचे फोटो व व्हिडिओही सर्वत्र व्हायरल झाले होते.

### आचारसंहितेच्या फेऱ्यात अडकल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या, नवीन नियुक्त्यांनाही फटका

मात्र त्यानंतरही जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता कायम असल्याने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या शेकडो पदोन्नती रखडल्या आहेत.

आचारसंहितेमुळे ज्या संवर्गच्या पदोन्नती रखडल्या आहेत त्यामध्ये सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, ग्राम विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत, शिक्षण, कृषि, आरोग्य), कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, समाज कल्याण निरीक्षक, सहायक पशुधन विकास अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सहायक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक, सहायक व कनिष्ठ लेखा अधिकारी आदी पदांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेमध्ये विविध पदांची नवीन भरती प्रक्रिया सुरू झाली होती. या पदांची लेखी परीक्षा देखील झाली होती त्याचे निकाल व अंतिम निवड यादी देखील प्रसिद्ध करण्यात आली होती मात्र त्यापैकी अनेक संवर्गातील नियुक्ती आदेश आचारसंहितेमुळे जारी करण्यात आले नाही.तरी जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचे मतदान संपन्न झाल्यामुळे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी निकाली काढण्यासाठी आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी कास्ट्राईब जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ सोहन चवरे, नरेंद्र धनविजय, परसराम गोंडाणे, प्रबोध धोंगडे, अनिल पवार, निरंजन पाटील, अब्दुल गफार आदींनी केली आहे.

### जूनपासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

जूनपासून लागू केल्या जाणाऱ्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक सेमिस्टर परीक्षेसाठी 60 गुण निश्चित करण्यात आले आहेत. 40 गुण हे सातत्यपूर्ण मूल्यमापनासाठी असतील. यात परीक्षा, प्रॅक्टिकल, असानमेंट आदींचा समावेश असेल.

# आयात होणारी महागाई !

महागाई, व्याजदर वाढीचा दर, जीडीपी याबाबतचा आर्थिक अहवाल नुकताच आशियाई विकास बँकेने प्रसिद्ध केला आहे. या अहवालात भारतातील सध्याची महागाई ही आयात केली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

आशिया खंडातील कॉकेशस पर्वत, मध्य, पूर्व, दक्षिण, दक्षिणपूर्व आशिया व पॅसिफिक प्रदेशातील एकूण 46 देशांच्या अर्थव्यवस्थेची पाहणी आशियाई विकास बँकेने (एशियन डेव्हलपमेंट बँक-एडीबी) नुकतीच करून त्यांचा अहवाल प्रसिद्ध केला. या सर्व राष्ट्रांमध्ये पुढील वर्षात सकल राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ किंवा महागाईची टक्केवारी याबाबत गेल्या तीन वर्षांचा आढावा घेऊन 2025 मध्ये काय स्थिती असू शकेल यावर मत व्यक्त केले आहे.

2025 या वर्षात भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) सर्वाधिक म्हणजे 7.2 टक्के राहील, त्याचवेळी भाववाढीचा किंवा चलनवाढीचा दर 4.5 टक्क्यांच्या घरात राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. अन्य सर्व देशांच्या तुलनेत भारताची कामगिरी आर्थिक विकासदरामध्ये सर्वात चांगली असल्याचे नमूद केले आहे. चीनमध्ये हा आर्थिक विकासाचा दर केवळ 4.5 टक्के राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून तेथे महागाईचा दर 1.5 टक्का राहील. पाकिस्तान या देशाची अर्थव्यवस्था जेमतेम 2.8 टक्के दराने वाढण्याचा अंदाज असून त्यांच्याकडे महागाईचा दर 2024 या वर्षात 25 टक्के तर 2025 मध्ये 15 टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

आशिया खंडातील विविध देशांचा सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा सरासरी आकडा 4.90 टक्के असून महागाईचा दरही 3 ते 3.2 टक्के राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. प्रत्यक्षात काही देशांची आर्थिक स्थिती यापेक्षाही कमी किंवा चिंताजनक असण्याची शक्यता आहे. म्यानमारमध्ये 10 टक्के महागाईचा दर तर पाकिस्तानमध्ये हा 15 टक्क्यांच्या घरात वर्तवण्यात आला आहे.

आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या श्रीलंकेमध्ये 2024 मध्ये आर्थिक विकासाचा दर 1.90 टक्के राहील तर 2025 मध्ये 2.5 टक्क्यांच्या घरात अपेक्षित आहे. त्यामानाने श्रीलंकेमध्ये महागाईला आळा घालण्यात बऱ्यापैकी यश मिळाले असून तीन वर्षांपूर्वीची 46.4 टक्क्यांची महागाई 2024 मध्ये 7.5 टक्क्यांवर आली आहे व पुढील वर्षांत म्हणजे 2025 मध्ये ती 5.5 टक्के राहील असा अंदाज व्यक्त केला आहे.

भारतात गेल्या दोन-तीन वर्षांत आरबीआयने काही चांगल्या उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला व महागाई दर मर्यादेपेक्षा जास्त वर जाणार नाही याची दक्षता घेतली; परंतु ती खूप खाली आणण्यात त्यांना यश आलेले नाही. देशात बेरोजगारी व महागाई हे सर्व सामान्यांना जाचक ठरणारे प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर बँकेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारताला आयात केलेल्या महागाईचा जास्त फटका बसण्याची शक्यता असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

आयात केलेली महागाई म्हणजे देशात मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते व त्याच्या किमती किंवा उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ होते तेव्हा त्याचा परिणाम देशांतर्गत भाववाढीवर होतो. अर्थशास्त्राच्या संकल्पनेनुसार कोणत्याही उत्पादन खर्चामध्ये कच्चामाल किंवा अन्य सेवा यांचा वापर होत असताना त्याच्या किमती वाढत असतात तेव्हा त्याचा बोजा स्वाभाविकपणे ग्राहकांवर पडतो आणि महागाई वाढण्यास हातभार लागतो.

जानेवारी महिन्यात संपूर्ण जगभरात तापमान वाढीने नवीन उच्चांकी पातळी नोंदवलेली होती व संपूर्ण पृथ्वीतलावरील तापमान वाढलेले होते. आशिया खंडातही या वाढत्या तापमानाचा गंभीर परिणाम होत असून पुढील काही काळात अत्यंत टोकाचे हवामान अनुभवास येण्याची शक्यता अहवालात वर्तवण्यात आली आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम विविध देशांच्या कृषी आणि अन्य क्षेत्रांवर होण्याची शक्यता आहे. विशेषतः अल्प उत्पन्न अर्थव्यवस्था असणार्या काही देशांच्या अन्नधान्य सुरक्षिततेवर याचा परिणाम होईल असा अंदाज अहवालात व्यक्त केला आहे.

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह या मध्यवर्ती बँकेचे पतधोरण हे अद्यापही खूप अस्थिर किंवा अनिश्चित असून त्याचा प्रतिकूल परिणाम आशिया खंडातील अनेक देशांवर व शेअर बाजारांवर होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अमेरिकेतील महागाईचे निर्मूलन अपेक्षेपेक्षा संथ होत असल्याने त्यांच्या व्याजदर रचनेमध्ये लवकर बदल होण्याची शक्यता कमी आहे. परिणामी जागतिक पातळीवर बहुतेक सर्व देशांमध्ये व्याजदर कमी होण्याची शक्यता नाही.

चीनमधील एकूण राष्ट्रीय उत्पन्न व तेथील महागाईचा दर याबाबतही स्वतंत्र मत व्यक्त केले असून सध्या तेथे मालमत्तेची बाजारपेठ अत्यंत क्षीण होत असून घरगुती वापरामध्येसुद्धा चांगली अपेक्षित वाढ होत नसल्याचे मत व्यक्त केले आहे. संपूर्ण आशिया खंडामध्ये भारतातील अर्थव्यवस्थेचा विकासदर हा सर्वाधिक राहणार असून एकूण होणारी गुंतवणूक, घरगुती मागणीमध्ये होत असलेली वाढ त्याचप्रमाणे इलेक्ट्रॉनिक्स व अन्य सेवांच्या निर्यातीमुळे सकल राष्ट्रीय उत्पन्न चांगले राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

डॉलरच्या तुलनेत रुपयाची झालेली घसरण हे प्रामुख्याने आयात होणार्या महागाईंचे प्रमुख कारण आहे. जेव्हा रुपयाची घसरण होते तेव्हा आपल्याला जास्त प्रमाणावर डॉलरच्या बदल्यात वस्तू किंवा सेवा आयात कराव्या लागतात. स्वाभाविकच आपला उत्पादन खर्च वाढत राहिल्याने त्याचा परिणाम महागाईवर होतो. पाश्चिमात्य देशांमध्ये होणार्या व्याजदर वाढीचा परिणाम भारतीय चलन घसरण्यामध्ये होतो. त्याचप्रमाणे अनेक वेळा आयातीचा खर्च वाढल्याचा फटका आपल्या भाववाढीला बसत असतो.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती उत्पादन कमी झाल्यामुळे वाढतात तेव्हा आयातीचा खर्च लक्षणीयरित्या वाढतो व त्याचा परिणाम देशातील उत्पादन व सेवा यांच्या भाववाढीवर होतो. एकंदरीत कोणत्याही प्रकारे उत्पादन खर्चामध्ये होणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वाढ ही एकूणच भाववाढीला कारणीभूत ठरते. सध्या तरी काही प्रमाणात आपला वाढता आयात खर्च कारणीभूत आहे असे लक्षात आले आहे. अनेक वेळेला व्यवसाय व्यापारामध्ये उत्पादन खर्च वाढला तर वस्तूच्या किमती किंवा सेवांच्या किमतीमध्ये वाढ होते.

ग्राहकांच्या मागणी पुरवठ्यावर जरी वस्तू किंवा सेवांच्या किमती ठरत असल्या तरीसुद्धा उत्पादन खर्चात होणारी वाढ हीसुद्धा महागाईला हातभार लावते. आंतरराष्ट्रीय बाजारात विनिमय दरामध्ये डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होत असली तरीसुद्धा उत्पादन खर्चातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आयात खर्च वाढीमुळे देशातील महागाईला हातभार लागतो. त्या दृष्टीने आयातीवर काही प्रमाणात निर्बंध आणून उत्पादन खर्च कमी करण्याकडे लक्ष केंद्रित करता येऊ शकते. परिणामतः आयात केलेल्या महागाईवर निश्चितपणे मार्ग काढता येऊ शकतो.

# मतदान जनजागृतीसाठी ठाण्यात 'रन फॉर वोट' या मिनी मॅरेथॉनचे आयोजन



ठाणे (जिमाका) : लोकसभा निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे यासाठी ठाणे शहरात आयोजित केलेल्या 'रन फॉर व्होट' या मिनी मॅरेथॉनला ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवकांनी मोठ्या संख्येने निवडणुक प्रक्रियेत सहभागी होवून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी मतदान करावे असा संदेश ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या तरुणांना दिला.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे महापालिका, ठाणे जिल्हा ॲथलेटिक असोसिएशन आणि ठाणे सिटीझन्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रन फॉर व्होट' या मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथील मुख्य रस्त्यावर ही मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. सदर मॅरेथॉन स्पर्धेस ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या मॅरेथॉन स्पर्धेला झेंडा दाखवून सुरूवात केली.

प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे. प्रत्येकाने येत्या २० मे रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करावे असे आवाहन ठामपा सौरव राव यांनी उपस्थित मतदारांना केले.

रन फॉर वोट' या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत २५ ठाणे-लोकसभा मतदार संघअंतर्गत, १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथक कर्मचा-यांनी धावपटू मतदारासोबत सहभागी होऊन मतदानाबाबत जनजागृती केली. तसेच स्वीपच्या पथकाने धावपटूंना मतदानाची शपथ दिली. मी मतदान करणारंच... आपण ही मतदानासाठी सज्ज रहा या आशयाचा मजकूर असलेले व त्यावर मतदान दिनांक 20 मे 2024 असलेले माहितीपत्रकाचे वाटपही उपस्थित धावपटू मतदार व नागरीकांना करण्यात आले. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेस धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईटवर तरुणांनी सेल्फी काढून मतदार जनजागृतीच्या घोषणा दिल्या.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघात स्थिर सर्वेक्षण पथकाकडून 2 लाख 8 हजार 370 रोख रक्कम जप्त

कल्याण : कल्याण लोकसभा मतदार संघातील कल्याण (पूर्व) विधानसभा मतदार संघाच्या स्थिर सर्व्हेक्षण पथकाने गुरुवारी 2 लाख 8 हजार 370 इतकी संशयास्पद रोख रक्कम जप्त केली. या पथकाची उसाटणे नाक्यावरील नवी मुंबई कडून कल्याणच्या दिशेने येणा-या वाहनांची तपासणी करुन, त्यामध्ये आढळलेल्या बेकायदेशीर वस्तु जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत नेमणूक करण्यात आली होती.

ऊसाटणे नाका या ठिकाणी नवी मुंबईकडून कल्याणच्या दिशेने येणा-या वाहनांची तपासणी करीत असताना दुपारच्या सुमारास नवी मुंबई कडून आलेल्या टाटा नेक्सॉन या गाडीची तपासणी करीत असताना, या गाडीमध्ये वाहनचालकाच्या बाजूच्या सीटवर 2 पिशव्या निदर्शनास आल्या. त्याबाबत संबंधित वाहनचालकास स्थिर सर्व्हेक्षण पथकाने विचारणा केली असता, संबंधित वाहनचालकाने या पिशव्यामध्ये रोख रक्कम असल्याबाबत सांगितले. परंतू सदर रोख रक्कमेबाबत संबंधित इसमास काहीही स्पष्टीकरण न देता आल्यामुळे तसेच रक्कमेच्या पुराव्याबाबत काहीही कागदपत्रे सादर करता न आल्यामुळे कल्याण (पूर्व) विधानसभा मतदार संघाच्या स्थिर सर्व्हेक्षण पथकाने ती रक्कम ताब्यात घेवून, या रक्कमेचा पंचनामा केला. तथापि रात्रीच्या वेळी उपकोषागार कार्यालय बंद असल्यामुळे हिललाईन पोलीस स्टेशन येथे पोलीस ठाण्याच्या सिलने हे लिफाफे सिलबंद करुन त्यावर पंचांच्या व पथकप्रमुखाच्या स्वाक्ष-या घेवून सिलबंद करण्याची कार्यवाही केली. या रक्कमेचे लिफाफे गुरुवारी रात्री हिललाईन पोलीस स्टेशनच्या स्ट्राँगरुम मध्ये जमा करण्यात आले. शुक्रवारी हे लिफाफे हिललाईन पोलीस स्टेशनकडून संकलीत करुन ते एका स्टिलच्या पेटीत कुलूप बंद करुन कल्याण कोषागारात सिलबंद करुन त्यांच्या स्ट्राँगरुममध्ये ठेवून पोहोच घेण्यात आली असल्याची माहिती कल्याण (पूर्व) विधान सभा मतदारसंघातील स्थिर सर्व्हेक्षण पथक प्रमुख राहुल गायकवाड यांनी दिली आहे.

## वारकरी भवनाच्या उभारणीसाठी कमतरता पडू देणार नाही सर्व पक्षीय नेत्यांचा वारकऱ्यांना शब्द




कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात प्रशस्त वारकरी भवन व्हावं ही वारकरी संप्रदायाची अनेक वर्षांपासून मागणी होती. वारकरी संप्रदायाच्या मागणी प्रमाणे कल्याण शहरात वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधत्व करणाऱ्या श्री. ज्ञानेश्वर माऊली बहुउद्देशीय वारकरी सेवाभावी ट्रस्टला महापालिकेने मौजे गंधारे माधव संकल्प इमारतीच्या बाजूला असलेला १२८४ चौ मीटर भूखंड भाडेतत्वार उपलब्ध करून दिला. याच भूखंडावर सदर कामाच्या नामफलकाचा अनावरण सोहळा अदर्श आचारसहितेचे पालन करुन अक्षयतृतीयेच्या मुहर्तावर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी "वारकरी भवन व महिला उद्योग भवनाच्या" उभारणीसाठी निधी कमी पडून देणार नसल्याचा शब्द सर्व पक्षीय नेत्यांनी वारकऱ्यांना दिला.

यावेळी आमदार विश्वनाथ भोईर, माजी आमदार नरेंद्र पवार, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक सुनील वायले, अर्जुन भोईर, भाजपा महिला शहर अध्यक्ष वैशाली पाटील, समाजसेवक भारत मिरकुटे, मनसे शाखा प्रमुख गणेश लांडगे, उद्योजक दिपक भंडारी, कृष्ण कारभारी, विकासक योगेश परदेशी, ज्येष्ठ वारकरी आदी मान्यवर उपस्थित होते.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सभागृहाने दिनांक २०/११/२०१३ रोजी झालेल्या सभा क्रमांक १० मध्ये तत्कालीन नगरसेवक सुनील वायले यांच्या प्रभाग क्रमांक २ गंधारे येथील माधव संकल्प या इमारतीच्या बाजूला १२८४ चौ.मीटर अशी ॲमेनिटी स्पेसच्या जागेवर वारकरी भवन आणि माहिला उद्योग केंद्र उभारण्याबाबतच्या ठरावाला मान्यता देण्यात आली. या मागणीचा विचार करून कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक २०/११/२०१३ रोजी केलेल्या ठरावाच्या दृष्टीने मौजे गंधारे माधव संकल्प इमारतीच्या बाजूला असलेला १२८४ चौ मीटर भूखंड "वारकरी भवन व महिला उद्योग भवनासाठी" महापालिका प्रशासनाने कल्याण शहरात वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधत्व करणाऱ्या श्री. ज्ञानेश्वर माऊली बहुउद्देशीय वारकरी सेवाभावी ट्रस्टला भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय नुकताच घेऊन तसा भाडे करार नोंदणीकृत केला.

यांनतर शुक्रवारी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर या ट्रस्टने सकाळी ११ वाजता सदर कामाच्या नामफलकाचा अनावरण सोहळा आयोजित केला होता. यावेळी कल्याण शहरातील राजकीय, सामाजिक व परमार्थिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (FWICE) च्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड



घाटकोपर - फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉइज (FWICE) ही 1956 पासून चित्रपट उद्योगाशी संबंधित अनेक लहान-मोठ्या संघटना आणि हस्तकलेची मदर बॉडी आहे, म्हणजे जवळपास 69 वर्षांपासून लाखो सदस्य असलेले हे फेडरेशन त्यांच्या सुरक्षिततेची आणि कल्याणाची काळजी घेण्यात येते. या संघटनेचे सदस्य आणि मुलभूत सुविधा पुरविण्याचे भर देत आहेत. संघटनेचा यंदाचा विद्यमान पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपला आहे, त्यामुळे FWICE पदाधिकारी आणि समिती सदस्यांनी एक संयुक्त बैठक घेतली आणि 2024-2027 या वर्षासाठी FWICE पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका जाहीर केल्या. वरील निवडणुका घेण्यासाठी अंजनी श्रीवास्तव यांची छाननी समितीच्या अध्यक्षपदी तर सुरेंद्र श्रीवास्तव आणि दिलीप पिठवा यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण 8 जागांसाठी 8 उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज भरले होते. वरील जागांसाठी अन्य कोणत्याही उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल न केल्याने 8 पैकी 8 उमेदवार बिनविरोध निवडून आले. अध्यक्षपदासाठी बीएन तिवारी, सरचिटणीस पदासाठी अशोक दुबे आणि खजिनदारपदासाठी गंगेश्वरलाल श्रीवास्तव (संजू) यांची निवड झाली. तसेच फिरोज (राजा) खान यांची वरिष्ठ उपाध्यक्ष, प्रमोद फाटक उपाध्यक्ष, स्टॅनले डिसोझा सहसचिव, दीपक खरात सहसचिव आणि नदीम खान संयुक्त कोषाध्यक्षपदी निवडून आले.

## दाभोलकर हत्येप्रकरणी सनातन संस्थेचे निर्दोषत्व सिद्ध

### साधक निर्दोषमुक्त भगव्या आतंकवादा'ला स्थापित करण्याचे षडयंत्र विफल




या प्रकरणात अंनिसचे केवळ साक्षीदारांशी संबंध असल्याचेच सिद्ध झाले इतकेच नव्हे, तर डॉ. दाभोलकरांच्या परिवाराने तपास यंत्रणांवरही दबाव आणला. परिणामी सनातन संस्थेचा पूर्वग्रहदूषितपणे तपास करण्यात आला. गेल्या ११ वर्षांत सनातनच्या १६०० साधकांच्या चौकशा करण्यात आल्या. सनातनच्या आश्रमांवर धाडी घालण्यात आल्या. या प्रकरणात मास्टरमाईंड शोधण्याच्या नावाखाली खटला प्रलंबित ठेवण्यात आला. सीबीआयने आरोपपत्रात सनातन संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची चौकशी करून त्यात कोणीही दोषी आढळले नाही, असे नमूद केले आहे. आज ११ वर्षांनंतर सनातन संस्थेला विलंबाने मिळालेला हा न्याय असल्याचे सनातन संस्थेचे प्रवक्ते चेतन राजहंस यांनी सांगितले.

कल्याण : डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणी न्यायालयाच्या निकालाचा आम्ही सन्मान करतो. या निकालानुसार सनातनचे साधक निर्दोषच होते, हेच सिद्ध झाले आहे. सनातन संस्था हिंदु आतंकवादी असल्याचे सिद्ध करण्याचे 'अर्बन नक्षलवाद्यां'चे षड्यंत्र विफल झाले आहे. पुणे सी.बी.आय. विशेष न्यायालयाने सनातन संस्थेचे साधक विक्रम भावे आणि हिंदु जनजागृती समितीशी संबंधित डॉ. विरेंद्रसिंह तावडे यांना निर्दोषमुक्त केले, तसेच हिंदु विधीज्ञ परिषदेचे ॲड. संजीव पुनाळेकर यांनाही निर्दोषमुक्त केले आणि हे करतांना या गुन्ह्यात लावलेला दहशतवादी कारवायांशी संबंधित UAPA कायदाही रद्द ठरवला आहे. हा UAPA कायदा लावून सनातन संस्थेला भगवे आतंकवादी ठरवून बंदी घालण्याचा डाव होता, तो या निकालाने ध्वस्त झाला आहे.

या प्रकरणात दोषी ठरवलेले हिंदुत्ववादी कार्यकर्ते सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांचा प्रत्यक्ष जरी सनातन संस्थेशी संबंध नसला, तसेच ते सनातन संस्थेचे पदाधिकारी नसले, तरी त्यांनाही या प्रकरणात गोवण्यात आले, अशी आम्हाला शक्यता वाटते. त्यामुळे या प्रकरणातील अधिवक्त्यांनी जशी इतरांना निर्दोष मुक्त करण्यात भूमिका बजावली, तशीच उच्च न्यायालयात हे प्रकरण नेऊन त्यांनाही निर्दोषमुक्त करण्यासाठी लढतील, असे त्यांनी आज घोषीत केले आहे. मुंबई उच्च न्यायालयात सचिन अंदुरे आणि शरद कळसकर हे निर्दोषमुक्त होतील, अशी खात्री सनातन संस्थेने व्यक्त केली.

## कल्याणमध्ये आम आदमी पार्टीचा जल्लोष



कल्याण : आम आदमी पार्टी राष्ट्रीय संयोजक दिल्ली राज्याचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजुर केला आहे. ज्या पध्दतीने दिल्ली कथीथ दारू घोटाळा प्रकरणात ईडीने कुठलेही ठोस पुरावे नसताना फक्त लोकसभा निवडणुकीत त्यांना प्रचारा पासुन दुर ठेवावे म्हणून सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली त्याना अटक केली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमुर्ती यांनी त्यांचा जामीन मंजुर केला. केजरीवाल यांना जामीन मंजूर झाल्यानंतर कल्याण डोबिवली शहरात आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करत नागरिकांना साखर वाटून तोडं गोड केले. यावेळी आम आदमी पार्टीचे कल्याण डोबिवली शहर अध्यक्ष धनंजय जोगदंड, कल्याण डोबिवली शहर उपाध्यक्ष रवि केदारे आदींसह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## मानपाडा पोलिसांच्या त्रासाला कंटाळून व्यावसायीकाने टाकली आत्महत्या करत असल्याची पोस्ट, गुरुवार पासून व्यावसायिक बेपत्ता



कल्याण : मानपाडा पोलीस स्टेशन मधील पोलिसांच्या त्रासास कंटाळून मराठा उद्योजक लॉबी चे सदस्य मराठी उद्योजक निवृत्ती वाघ यांनी सोशल मीडियावर आत्महत्या संदर्भात पोस्ट करून गायब झाले आहेत. याप्रकरणी मराठा उद्योजक लॉबीच्यावतीने मानपाडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांना पत्र देत यामध्ये दोषी असलेल्या पोलिसांचे निलंबन करून लवकरात लवकर निवृत्ती वाघ यांचा शोध घेण्याची मागणी केली आहे.

निवृत्ती वाघ यांचा लॉजिंग बोर्डिंगचा व्यवसाय असून मागील काही दिवसापासून वाघ हे मानपाडा पोलीस स्टेशन मधील अधिकाऱ्याच्या त्रासास सामोरं जात आहेत. अत्यंत खालच्या दराच्या शिव्या. खोट्या केसेस दाखल करायच्या धमक्या हफ्ता साठी बळजबरी. याविषयी त्यांनी सोशल मीडिया वर पोस्ट केली आहे. पोलिसांच्या त्रासाला कंटाळून आपण आत्महत्या करत असल्याची पोस्ट वाघ यांनी टाकत ते गायब झाले आहेत. यामुळे एकच खळबळ उडाली असून पोलिसांच्या विषयी संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मराठा उद्योजक लॉबी गेल्या ८ वर्षापासून मराठी व्यवसायासाठी अहोरात्र झटत आहे. मराठी माणूस उद्योजक झाला पाहिजे म्हणून. मराठा उद्योजक लॉबीची स्थापना झाली आहे. सध्या ५लक्ष मेंबर असलेली चळवळ उंची गाठत असताना असा वाईट अनुभव येत आहे. या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरात लवकर निवृत्ती वाघ यांचा लवकरात शोध घेऊन नावे असणाऱ्या पोलिसांचे निलंबन झाले पाहिजे अशी मागणी मराठा उद्योजक लॉबीने केली आहे.

यावेळी मराठा उद्योजक लॉबीचे संस्थापक अध्यक्ष विनोद बढे, मंगेश शेळके, अभिजित देसाई, आदेश दूर्गुडे, सयाजी चव्हाण, प्रकाश खोपडे, रणजित देसाई, निलेश बिराजदार, प्रवीण जाधव, रवि निमसे, अंकुश मुळीक, सचिन पाटिल आदी जण उपस्थित होते.

## लोकनेते दि. बा. पाटील यांना मानणाऱ्या प्रत्येकाने आपले मत डॉ. श्रीकांत शिंदेंना द्यावे.. हीच दि. बा. पाटील यांना खरी श्रद्धांजली ठरेल

### - दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांचे आवाहन



कल्याण : लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रस्ताव मंजूर करून केंद्राकडे पाठवला आहे. त्यामुळे दि. बा. पाटील साहेबांना मानणाऱ्या प्रत्येकाने आपले मत डॉ. श्रीकांत शिंदे यांनाच द्यावे, हीच दि. बा पाटील यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आवाहन लोकनेते दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांनी केले. अखिल भारतीय आगरी समाज परिषद आणि लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ समितीच्या वतीने आज कल्याण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. यानंतर डोंबिवली येथे माध्यमांना प्रतिक्रिया देताना अतुल पाटील यांनी हे आवाहन केले.

यापूर्वीच्या सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यायला ते तयार नव्हते. त्यांचे सरकार अल्पमतात आल्यानंतर त्यांनी नाईलाजाने घाईघाईत मंत्रिमंडळ बैठकीत हा प्रस्ताव मंजूर केला, मात्र त्याला कायदेशीर मान्यता नव्हती. मात्र एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होताच त्यांनी हा ठराव विधानसभा आणि विधानपरिषदेत बहुमताने मंजूर करून घेतला आणि केंद्राकडे पाठवला.

आता केंद्र सरकारही याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास अखिल भारतीय आगरी समाज परिषद आणि लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ समितीचे सदस्य, आगरी समाजातील ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. तसेच फक्त विमानतळच नव्हे, तर कोकण पट्ट्यातील आमचे सगळे प्रश्न सोडवण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले आहे. त्यामुळे आज डॉ. श्रीकांत शिंदे हे निवडणुकीला उभे असताना आम्हाला ज्यांनी पाठिंबा दिला, त्यांना पाठिंबा देणे हे आमचे कर्तव्य असल्याची भावना रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली.

आगरी समाजाला एकनाथ शिंदे आणि डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यामुळे खऱ्या अर्थाने बळ मिळाल्याचेही ते म्हणाले. तसेच आमचा आगरी समाज म्हणून डॉ. श्रीकांत शिंदे यांना भक्कम पाठिंबा असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. याप्रसंगी अखिल भारतीय आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील, लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ समितीचे अध्यक्ष अतुल पाटील, आगरी समाजातील ज्येष्ठ नेते राम ठाकूर, गुलाब वझे, विनोद म्हात्रे, दत्तात्रय वझे, दशरथ भगत, बंडू पाटील यांच्यासह आगरी समाजातील मान्यवर आणि नेते उपस्थित होते. आगरी समाजाच्या पाठिंबामुळे डॉ. श्रीकांत शिंदे हे तिसऱ्यांदा खासदार म्हणून विक्रमी मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास याप्रसंगी आगरी समाजाच्या नेत्यांनी व्यक्त केला.

## माजी नगरसेविका माधुरी काळे यांची शिवसेना कल्याण पूर्व 'उपजिल्हा संघटक' पदी नियुक्ती



कल्याण : कल्याण पूर्वेतील विजयनगर गवळी नगर प्रभागाच्या शिवसेनेच्या माजी नगरसेविका माधुरी काळे यांची शिवसेना कल्याण पूर्व उपजिल्हा संघटक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जनसेवेची आवड असलेल्या माधुरी काळे यांनी राजकारणात प्रवेश करताच त्यांना विजय नगर - गवळी नगर प्रभागातील जनतेने कल्याण डोंबिवली महापालिकेत प्रभागाचे नेतृत्व करण्यासाठी प्रचंड मतांनी निवडून दिले होते. संघटन कौशल्य आणि प्रचंड जनसंपर्क या त्यांच्या कतृत्वाचा विचार करून शिवसेना मुख्य नेते आणि राजाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माधुरी काळे यांच्यावर कल्याण पूर्व उपजिल्हा संघटक पदाची जबाबदारी सोपविली आहे.

## शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याला ठाकरे गटाच्या कार्यकर्त्याकडून धमकी

कल्याण : दोन दिवसात राजकारण सोडून संन्यास घ्यायचा, कल्याण सोडून निघून जायचे, नाहीतर संपवून टाकेन अशी धमकी दिल्याचा आरोप करत शिवसेना शिंदे गटाच्या महिला पदाधिकाऱ्याने मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याने एकच खळबळ उडाली आहे. विजया पोटे व त्यांचे पती अरविंद पोटे यांनी नुकताच ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केला होता. अरविंद पोटे यांना ठाकरे गटाचे ज्येष्ठ शिवसैनिक बाळ हरदास यांनी धमकी दिल्याचा आरोप त्यांनी केलाय. याबाबत त्यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीनंतर मानपाडा पोलीस ठाण्यात ठाकरे गटाचे ज्येष्ठ कार्यकर्ते बाळ हरदास यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. तर दुसरीकडे याप्रकरणी बाळ हरदास यांनी पोटे यांनी केलेले आरोप चुकीचे आहेत, खोटे आहेत.

## मानवतेच्या मसीहाला नमन करण्यासाठी निरंकारी भक्तांकडून समर्पण दिवसाचे आयोजन

### 13 मे रोजी डोंबिवली व मुंबई परीक्षेत्रात एकूण 40 ठिकाणी विशेष सत्संग समरोहांचे आयोजन



NIRANKARI BABA HARDEV SINGH JI

कल्याण : हृदय सम्राट बाबा हरदेवसिंहजी यांच्या पावन स्मृति प्रित्यर्थ 'समर्पण दिवस' समारोहाचे मुख्य आयोजन सोमवार, दि. 13 मे रोजी सांय 5 ते रात्री 9.30 वाजेपर्यंत संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात करण्यात येणार आहे ज्यामध्ये मोठ्या संख्येने निरंकारी जगतातील भाविक भक्तगण सहभागी होऊन बाबा हरदेवसिंहजी यांच्या प्रति आपली श्रद्धा सुमने अर्पण करतील. समर्पण दिवसाच्या निमित्ताने स्थानिक स्तरावर एकूण 40 ठिकाणी विशेष सत्संग समारोह आयोजित केला जाणार असून त्यामध्ये मुंबई व डोंबिवली परिसरातील समस्त निरंकारी भक्तगण सहभागी होणार आहेत.

बाबा हरदेवसिंहजी प्रेम व करूणेचे मूर्तिमंत रूप होते. त्यांनी साधी राहणी आणि आपल्या दिव्य हसतमुख मुद्रेने केवळ भक्तगणांनाच कृतार्थ केले असे नाही तर समस्त मानवजातीला कल्याणकारी मार्ग स्वीकारुन सार्थ व समाधानी जीवन जगण्याची कला शिकवली. याच कारणाने समाजातील प्रत्येक वर्गातील लोकांमध्ये ते सदैव आवडते बनून राहिले. एक पथ प्रदर्शक बनून बाबाजींनी प्रत्येक भक्ताला आधार दिला ज्यायोगे तो एक सहज सुंदर व सशक्त जीवन जगू शकेल. आध्यात्मिक जागरुकतेबरोबरच समाज कल्याण कार्यांमध्ये बाबाजींनी आपले सकारात्मक योगदान दिले त्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, महिला सशक्तिकरण, शिक्षण अशा अनेक परियोजनांचा समावेश आहे.

## मुरबाड विधानसभा मतदारसंघातील ३५ गृह मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क !

मुरबाड - भिवंडी लोकसभा मतदारसंघातील मुरबाड विधानसभा मतदारसंघातील ३५ गृह मतदारांनी गृह मतदानाचे नोंद केली होती. या ३५ च्या ३५ जणांनी शुक्रवारी आपला मतदानाचा हक्क बजावला. कल्याण ग्रामीण, अंबरनाथ ग्रामीण, कुळगांव बदलापूर नगरपरिषद आणि मुरबाड तालुका हद्दीतील ३५ जून अधिक मतदारांनी हा मतदानाचा हक्क बजावला. ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी यंदा पहिल्यांदाच केंद्रीय निवडणूक आयोगाने गृह मतदानाची सोय केली आहे. मुरबाड तहसील विधानसभा मतदार संघातील ३५ जणांनी गृह मतदानासाठी नोंद केली असल्याची माहिती अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुरबाडचे तहसीलदार संदीप आवारी यांनी दिली. हे मतदान करण्यासाठी पाच पोलीस पार्टी नेमण्यात आल्या होत्या. यातील तीन पोलीस पार्टी या कुळगांव बदलापूर आणि अंबरनाथ ग्रामीण क्षेत्रासाठी ठेवण्यात आल्या होत्या. तर एक पोलीस पार्टी मुरबाड तालुक्यात आणि दुसरी पार्टी कल्याण ग्रामीण क्षेत्रासाठी नेमण्यात आली होती अशी माहिती आवारे यांनी दिली. या पोलींग पार्टीने घरी जाऊन गुप्त पद्धतीने हे मतदान घेतलं.

# धोनीचा षटकार आणि एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी बरोबरी

## विराट-रोहितच्या खास क्लबमध्ये झाला सामील

आयपीएल २०२४ मधील ५९ वा सामना गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात खेळला गेला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात घरचा संघ गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्जचा ३५ धावांनी पराभव केला. या सामन्यातील पराभवामुळे चेन्नईच्या प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या अडचणी वाढल्या आहेत. चेन्नई सुपर किंग्जचा संघ हा सामना हरला असला तरी कोट्यवधी चाहत्यांच्या लाडक्या एमएस धोनीने एक खास विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे.

एमएस धोनीने डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी बरोबरी साधली –

चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार एमएस धोनीने गुजरात टायटन्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात ११ चेंडूत २६ धावांची नाबाद खेळी केली. या सामन्यात त्याने एक चौकार आणि तीन षटकार ठोकले. या सामन्यात धोनीने तिसरा षटकार ठोकताच एबी डिव्हिलियर्सच्या विक्रमाशी बरोबरी साधली. एमएस धोनीच्या नावावर आता आयपीएलमध्ये २५१ षटकार आहेत. महान फलंदाज एबी डिव्हिलियर्सनेही आयपीएलमध्ये इतकेच षटकार ठोकले आहेत. डिव्हिलियर्सने १७० डावात २५१ षटकार मारले, तर



धोनीने २२८ डाव घेतले. आता हे दोन्ही फलंदाज आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानावर आहेत.

धोनी विराट-रोहितच्या खास क्लबमध्ये झाला सामील –

एमएस धोनी आयपीएलच्या इतिहासात २५० षटकारांचा टप्पा पार करणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. याआधी विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनीही ही कामगिरी केली आहे. रोहित शर्माच्या नावावर २५० डावांमध्ये २७६ षटकार आहेत, तर विराट कोहलीने आतापर्यंत २४१ डावांमध्ये २६४ षटकार मारले आहेत. याशिवाय आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर आहे. आयपीएलमध्ये गेलने ३५७ षटकार मारले आहेत.

आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज –

- ख्रिस गेल – ३५७ षटकार
- रोहित शर्मा – २७६ षटकार
- विराट कोहली – २६४ षटकार
- एबी डिव्हिलियर्स – २५१ षटकार
- एमएस धोनी – २५१ षटकार

चेन्नई सुपर किंग्जला महत्त्वाच्या सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. या सामन्यातील पराभवामुळे संघाला नेट रन रेटचे नुकसान झाले आहे. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजी करताना गुजरातने शुबमन गिल आणि साई सुदर्शन यांच्या शतकांच्या जोरावर २० षटकांत तीन गडी गमावून २३१ धावा केल्या.

या सामन्यात शुबमनने ५५ चेंडूत १०४ धावांची तर साई सुदर्शनने ५१ चेंडूत १०३ धावांची शानदार खेळी केली. तर दुसऱ्या डावात चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवातीलाच धक्के बसले. या सामन्यात त्यांचा टॉप ऑर्डर पूर्णपणे अपयशी ठरला. मिशेल आणि मोईन यांनी मधल्या षटकांमध्ये काही धावा केल्या, तरीही संघाला २० षटकांत ८ गडी गमावून १९६ धावांपर्यंतच मजल मारता आली. ज्यामुळे गुजरातने हा सामना सहज जिंकला.

## शुबमन गिलसह संपूर्ण संघाला ठोठावला दंड

# गुजरातच्या संघाला विजयाचा आनंद साजरा करतानाच दुहेरी धक्का

शुबमन गिल आणि साई सुदर्शनच्या शतकी तडाख्याच्या जोरावर गुजरात टायटन्सने चेन्नईवर विजय मिळवला. नरेंद्र मोदी स्टेडियमवर शुक्रवारी झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने मोहित शर्मा (३-३१) आणि राशीद खानच्या (२-३८) भेदक गोलंदाजीमुळे चेन्नई सुपर किंग्सचा संघाला ३५ धावांनी पराभव पत्करावा लागला. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २३१ धावांचा डोंगर उभारला तर चेन्नई सुपर किंग्जला ८ बाद १९६धावाच करता आल्या. या विजयासह गुजरात टायटन्सने इंडियन प्रीमियर लीगमधील प्लेऑफच्या आशा कायम ठेवल्या आहेत. मात्र, या विजयानंतर बीसीसीआयने कारवाई करत गिलसह संघाला दंड ठोठावला आहे.

गुजरातचा कर्णधार शुभमन गिलला चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या आयपीएल सामन्यादरम्यान स्लो ओव्हर रेटसाठी २४ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा गुजराचत संघाचा सीझनमधील



दुसरा स्लो ओव्हर रेटचा गुन्हा होता आणि यानंतर इम्पॅक्ट खेळाडूसह उर्वरित ११ खेळाडूंना वैयक्तिकरित्या ६ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला. गुजरातने गतविजेत्या चेन्नईचा पराभव करत आयपीएल २०२४ च्या प्लेऑफच्या शर्यतीत आपले स्थान कायम ठेवले आहे. टायटन्स आता १२ सामन्यांत १० गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर आहे.

■ शुभमन गिल (१०४) आणि साई सुदर्शन (१०३) या गुजरातच्या सलामीवीरांनी वादळी शतके पूर्ण केली. या दोघांनीही पहिल्या विकेटसाठी २१० धावांची भागीदारी करत जीटीला ३ बाद २३१ धावांचा डोंगर उभारून दिला. सीएसकेने पहिल्या तीन षटकांत तीन विकेट गमावल्या. डॅरिल मिशेल (६३) आणि मोईन अली (५६) यांनी १०९ धावांची भागीदारी रचली तरीही CSK २० षटकांत ८ बाद १९६ धावा करू शकला. या विजयासह गुजरात तळाच्या स्थानावरून आठव्या स्थानावर पोहोचली आहे. दरम्यान, चेन्नईचा संघ १२ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. सीएसकेचा संघ गुण आणि नेट रनरेटच्या बाबतीत दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्सपेक्षा पुढे असला तरी सीएसकेचा पराभव संघासाठी आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूला महागात पडला आहे.

# भव्य सेट, खरे दागिने अन ...; संजय लीला भन्साळींनी घेतले ६० कोटी

## ‘हीरामंडी’चं बजेट किती? कोणाला किती मानधन मिळालं?



संजय लीला भन्साळी यांचे चित्रपट म्हटलं की भव्यदिव्य सेट, राजवाडे, भरजरी दागिने अन् कपडे यांचा मिलाफ त्यात हमखास पाहायला मिळतोच. हीच परंपरा त्यांनी ‘हीरामंडी’ या वेब सीरिजमध्ये कायम ठेवली आहे. या सीरिजची प्रदर्शनाच्या आधीपासूनच जोरदार चर्चा होती. या सीरिजचं बजेटही खूप जास्त आहे. या सीरिजसाठी कुणाला किती मानधन मिळालं, हीरामंडीचं बजेट किती, संजय लीला भन्साळींनी दिग्दर्शनासाठी पैसे आकारले, याबाबत ‘मनी कंट्रोल’ने वृत्त दिलं आहे.

‘हीरामंडी’ या बहुप्रतिक्षित वेब सीरिजच्या माध्यमातून संजय लीला भन्साळी यांनी ओटीटी पदार्पण केलं आहे. त्यांचं दिग्दर्शन असलेली ही सीरिज नेटफ्लिक्सवर १ मे पासून प्रसारित होत आहेत. महागडे खरे दागिने, भरजरी कपडे, आलिशान महाल अन् अवाढव्य सेट या सीरिजमध्ये पाहायला मिळतात. पण ही सीरिज फक्त याच गोष्टींमुळे नाही तर कलाकारांच्या मानधनामुळेही चर्चेत आहे.

## अपराजित लेव्हरकूसेनची विक्रमी कामगिरी



जोसिप स्टॅनिसिचने ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत केलेल्या गोलच्या जोरावर जर्मन संघ बायर लेव्हरकूसेनने युरोपा लीग फुटबॉलमधील उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात इटालियन संघ एएस रोमाला २-२ असे बरोबरीत रोखले. यासह लेव्हरकूसेनने सर्व स्पर्धांतील आपले अपराजित्वही कायम राखताना युरोपीय क्लबसाठी नवा विक्रमही रचला.स्पेनचा माजी मध्यरक्षक झाबी अलोन्सोच्या मार्गदर्शनाखाली खेळणारा लेव्हरकूसेनचा संघ सर्व स्पर्धांत मिळून सलग ४९ सामने अपराजित असून त्यांनी बेन्फिकाचा विक्रम मोडीत काढला. बेन्फिकाचा संघ डिसेंबर १९६३ ते फेब्रुवारी १९६५ या कालावधीत सलग ४८ सामने अपराजित राहिला होता.लेव्हरकूसेनचा संघ रोमाविरुद्धच्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात पराभवाच्या छायेत होता. लिआंड्रो पेरेडेसच्या दोन गोलच्या जोरावर रोमाने ६६व्या मिनिटाला २-० अशी आघाडी मिळवली होती. मात्र, त्यानंतर ८२व्या मिनिटाला जिआनलुका मॅन्चिनीकडून झालेल्या स्वयंगोलमुळे लेव्हरकूसेनच्या आशा पल्लवित झाल्या. मग ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेतील सातव्या मिनिटाला स्टॅनिसिचने गोल करत लेव्हरकूसेनला बरोबरी करून दिली.

# या आठवड्यात OTT वर आलेत जबरदस्त चित्रपट आणि वेब सीरिज

प्रत्येक वीकेंडप्रमाणे या वीकेंडलाही तुम्ही अनेक धमाकेदार चित्रपट आणि सीरिज ओटीटीवर प्रदर्शित होण्याची वाट पाहत असाल. अनेकांना कोणत्या ना कोणत्या कारणाने सिनेमागृहात जाऊन चित्रपट पाहता येत नाही, ते घरी बसून ओटीटीवर सीरिज व मालिका पाहतात. अशा प्रेक्षकांसाठी या आठवड्यात एकापेक्षा एक कलाकृती ओटीटीवर प्रदर्शित होत आहेत. नेटफ्लिक्स, प्राइम,व्हिडीओ, झी 5 वर प्रदर्शित होणारे चित्रपट व सीरिज तुमचा वीकेंड खास बनवतील.

या वीकेंडला ओटीटीवर ॲक्शन, हॉरर, सस्पेन्स आणि कॉमेडी असे सर्व जॉनरमधील चित्रपट ओटीटीवर येत आहेत. कोणते नवीन चित्रपट आणि वेब सीरिज कुठे आणि कधी प्रदर्शित होणार आहेत ते जाणून घेऊयात.



### आवेशम

‘आवेशम’ हा २०२४ मल्याळम ॲक्शन कॉमेडी चित्रपट आहे. हा चित्रपट 9 मे २०२४ रोजी प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित झाला आहे.

आवेशम

‘आवेशम’ हा २०२४ मल्याळम ॲक्शन कॉमेडी चित्रपट आहे. हा चित्रपट 9 मे २०२४ रोजी प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित झाला आहे.

## दैनिक राशी भविष्य

**मेष** -संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. आज तुम्ही धन संबंधाने जोडलेल्या समस्यांच्या कारणाने चिंतीत राहू शकतात यासाठी तुम्हाला आपल्या कुठल्या विश्वासपात्रचा सल्ला घेतला पाहिजे.

**वृषभ** - आज तुम्ही केलेले शारिरीक बदल यामुळे तुमचे व्यक्तिमत्व निश्चितपणे खुलून दिसेल. प्रलंबित घटना,वादग्रस्त विषय संदेहास्पद होतील आणि खर्चामुळे तुमचे मन काळवंडून जाईल..

**मिथुन** - धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्हाला आपले धन खर्च करण्याची गरज पडणार नाही कारण, घरातील कुणी मोठे व्यक्ती तुम्हाला धन धन देऊ शकतात.

**सिंह** - परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो.

**कन्या** - ततुम्ही संपूर्ण आराम करायला हवा अन्यथा थकव्यामुळे तुमच्या निराशावादी दृष्टिकोन कार्यरत होऊ शकतो. कार्य क्षेत्रात किंवा व्यवसायात तुमचा निष्काळजीपणा आज तुम्हाला आर्थिक नुकसान देऊ शकतो.

**तुळ** - निव्वळ मजा, आनंद तुम्ही लुटू शकाल - कारण आयुष्य संपूर्ण मजेत घालवणे हाच तुमचा विचार असतो. आजच्या दिवशी घरातील इलेक्ट्रोनिक वस्तू खराब होण्याच्या कारणाने धन खर्च होऊ शकते.

**वृश्चिक** - सर्वसाधारणपणे आरोग्य चांगले असेल, पण प्रवास कटकटीचा आणि तणावपूर्ण ठरेल. तुमच्या हातून पैसे अगदी सहजपणे खर्च होत असले तरी तुमच्या राशीतील शुभ ता-यांमुळे तुम्हाला सतत अर्थपुरवठा होत राहील.

**धनु** - अपेक्षित मातांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. शक्य झाल्यास धुम्रपान करणा-या आपल्या मित्रासोबत थांबणे टाळा, तुमच्या होणा-या बाळावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

**मकर** - तुम्ही संपूर्ण आराम करायला हवा अन्यथा थकव्यामुळे तुमच्या निराशावादी दृष्टिकोन कार्यरत होऊ शकतो. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. तरुणाईचा सहभाग असणा-या उपक्रमात स्वतःला गुंतविण्यासाठी चांगली वेळ आहे.

**कुंभ** - तुमचे आरोग्य आणि ऊर्जा बचतीची सवय तुम्हाला दीर्घ काळ प्रवासाच्या योजनेसाठी फायदेशीर ठरेल. अतिशय व्यस्त असूनही तुम्ही आरोग्य चांगले राखल्यामुळे थकवा येणार नाही.

**मीन** - तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. चढउतारांमुळे फायदा होईल. दिवसाच्या उत्तरार्धात होणारी एखाद्या जुन्या मित्राची भेट उल्हसित करेल. आजच्या दिवशी प्रेमामध्ये यातना सहन कराव्या लागण्याची शक्यता आहे.या राशीतील लोकांना स्वतःसाठी खूप वेळ मिळेल. यावेळचा उपयोग तुम्ही आपले शोक पूर्ण करण्यात लावू शकतात.

# झोप आहे महत्त्वाची!

## उन्हाळ्यात तंदुरुस्त राहण्याचे १० सोपे मार्ग

उन्हाळा हा वर्षातील सर्वात कठीण ऋतू असतो. उष्णता आणि दमट हवामान आपल्याला थकवू शकते आणि आपल्याला निष्क्रिय बनवू शकते. उन्हाच्या झळांमुळे तुम्ही त्रासले जाता. ऑफिसमध्ये काम करताना एसीची थंड हवा असते पण बाहेर पडताच पुन्हा अंगाची लाही लाही होऊ लागते. तरीही, उन्हाळ्यात ताजेतवाने आणि सक्रिय राहणे शक्य आहे.



उन्हाळ्यात तंदुरुस्त राहण्याचे १० सोपे मार्ग

हे १० सोपे मार्ग आहेत जे तुम्हाला उन्हाळ्यात तंदुरुस्त आणि ताजेतवाने राहण्यास मदत करतील:

१. हायड्रेटेड रहा: उन्हाळ्यात शरीराला जास्त पाण्याची आवश्यकता असते. दिवसभर नियमितपणे पाणी प्या, विशेषतः व्यायाम करताना किंवा बाहेर असताना.

२. हलके कपडे घाला: हलके, सुती कपडे घाला जे तुमच्या त्वचेला श्वास घेण्यास आणि थंड राहण्यास मदत करतील.

३. नियमित व्यायाम करा: व्यायाम आपल्याला तंदुरुस्त आणि सक्रिय राहण्यास मदत करते आणि उष्णतेचा सामना करण्याची तुमची क्षमता सुधारते. सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा व्यायाम करणे चांगले.

४. सूर्यापासून स्वतःचे संरक्षण करा: सकाळी १० ते ४ च्या दरम्यान थेट सूर्याच्या प्रकाशापासून दूर रहा. सनस्क्रीन, टोपी आणि छत्री वापरा.

५. हलके आणि पौष्टिक आहार घ्या: उन्हाळ्यात हलके आणि पौष्टिक आहार घ्या. फळे, भाज्या, सूप आणि दही यांचा समावेश करा.

उन्हाळ्यात तंदुरुस्त राहण्याचे १० सोपे मार्ग

Summer 2024 : उन्हाळ्यात पंख्यातूनच कुलरसारखी थंड हवा!

६. पुरेशी झोप घ्या: उन्हाळ्यात पुरेशी झोप घेणे महत्त्वाचे आहे. झोप आपल्याला थकवा दूर करण्यास आणि उष्णतेचा सामना करण्याची तुमची क्षमता सुधारते.

७. थंड पेये प्या: पाणी, लिंबू पाणी, नारळ पाणी आणि ताक सारखी थंड पेये प्या.

८. थंड स्नान करा: दिवसभर थंड पाण्याने अंघोळ करा.

९. घरात थंडावा ठेवा : घरात थंड हवा राखण्यासाठी एअर कंडिशनर किंवा पंखा वापरा. खिडक्या आणि दरवाजे उघडे ठेवा.

१०. थंड ठिकाणी वेळ घालवा.

# तुमच्या पोटाचे आरोग्य सुधारण्यासाठी हळदीचे १० अद्भुत फायदे

हळद हे भारतीय संस्कृतीमध्ये शतकानुशतके वापरले जाणारे एक बहुगुणी मसाले आहे. त्याचे औषधी गुणधर्म जगभरात प्रसिद्ध आहेत. हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचे एक सक्रिय संयुग असते ज्यामध्ये अनेक आरोग्य फायदे आहेत. यात पोटाचे आरोग्य सुधारण्याची क्षमता देखील समाविष्ट आहे.

हळद पोटाचे आरोग्य कसे सुधारते?

जळजळ आणि अपचन कमी करते: हळदीमध्ये असलेले कर्क्यूमिन जठरातील आम्लाचे प्रमाण कमी करते आणि जळजळ आणि अपचन कमी करते.

पोटातील बळतरा कमी करते: हळद पोटातील सूज कमी करते.

आतड्यांचे आरोग्य सुधारते: हळद आतड्यांमधील चांगल्या जीवाणूंची वाढ करते आणि वाईट जीवाणूंचा नाश करते. यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि



बद्धकोष्ठता आणि अतिसार यांसारख्या समस्या कमी होतात.

यकृत कार्य सुधारते: हळद यकृताचे कार्य सुधारते आणि पोटातील चरबी कमी करते.

जठराचा अल्सर टाळण्यास मदत करते: हळद पोटातील अम्लाचे प्रमाण नियंत्रित करते आणि जठराचा अल्सर टाळण्यास मदत करते.

पोटातील वेदना कमी करते: हळद पोटातील वेदना आणि सूज कमी करते.

पाचनशक्ती सुधारते: हळद पाचनशक्ती सुधारते आणि अन्न शोषण्यास मदत करते.

रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते: हळद रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते आणि संसर्गापासून लढण्यास मदत करते.

वजन कमी करते: हळद चयापचय वाढवते आणि वजन कमी करण्यास मदत करते.

हळदीचे अनेक गुणधर्म आहेत जे पोटासह अन्य अनेक व्याधींवर उपायकारक आहेत.

हळद कशी वापरावी?

हळद अनेक प्रकारे वापरली जाऊ शकते. तुम्ही ते दूधात मिसळून पिऊ शकता, चहात घालू शकता किंवा करी आणि इतर पदार्थांमध्ये मसाले म्हणून वापरू शकता. हळदीची पूरक आहार स्वरूपात देखील उपलब्ध आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०१०: एस. एच. कपाडीया यांनी भारताचे ३८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

१९९८: केन्द्र सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वय ५८ वर्षांवरुन ६० वर्षे करण्याचा केन्द्र सरकारचा निर्णय.

१९८७ : ब्रिटीश रॉयल नेव्ही मधील एचएमएस हार्मिस हि युद्धनौका विकत घेऊन भारताने तीला आयएनएस विराट या नावाने दाखल केले. १९६५: सोव्हिएट अंतराळ स्थानक लूना ५ चंद्रावर कोसळले.

१९५५: दुसरे महायुद्ध - संपल्यावर ऑस्ट्रियाने दोस्त राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवले.

१९४१: बर्लिनमधील कोनराड झुझ यांनी जगातील पहिले पूर्णतः स्वयंचलित संगणक Z सादर केले.

१९०९: सेवानंद बाळुकाका कानिटकर, डॉ. गजानन श्रीपत तथा अण्णासाहेब खेर आणि वि. ग. केतकर यांनी पुणे अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना केली.

१७९७ : नेपोलिअनने व्हेनिस जिंकले.

१६६६: आग्रा शिवाजी महाराज व औरंगजेब यांची पहिली व शेवटची भेट झाली.

१५५१: अमेरिकेतील सर्वात जुने विद्यापीठ सान मार्कोस राष्ट्रीय विद्यापीठाची सुरवात झाली.

१३६४: पोलंड देशातील सर्वात जुने विद्यापीठ जगीलीनियन विद्यापीठाची सुरवात झाली.

**जन्म**

१९३० : राधाकृष्ण हरिराम तहिलियानी भारतीय नौसेनाधिपती (निधन : १४ ऑक्टोबर २०१५)

-

१९०७: विजय भट - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक (निधन : १७ ऑक्टोबर १९९३)

१९०७ : कॅथरिन हेपबर्न - हॉलिवूड अभिनेत्री (निधन: २९ जून २००३)

१९०५: आत्माराम रावजी भट - भारतीय कृतिशील विचारवंत - पद्मश्री (निधन : १८ जानेवारी १९८३)

१८९५: जे. कृष्णमूर्ती - भारतीय तत्त्वज्ञ (निधन: १७ फेब्रुवारी १९८६)

१८६३: उपेंद्रकिशोर रे - भारतीय चित्रकार आणि संगीतकार (निधन: २० डिसेंबर १९१५)

१८२०: फ्लॉरेन्स नाईटिंगेल - परिचारिका आणि आधुनिक रुग्णपरिचर्या शास्त्राच्या जनक (निधन : १३ ऑगस्ट १९१०) १७६७: मॅन्युएल गोडॉय - स्पॅनिश जनरल आणि राजकारणी, स्पेन देशाचे माजी पंतप्रधान (निधन: ४ ऑक्टोबर १८५१)

**निधन**

२०२२ : रमेश लटके - राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार

२०१४: शरत पुजारी - भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक (जन्म: ८ ऑगस्ट १९३४)

२०१३ : के. बिक्रम सिंग भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते (जन्म: २६ मे १९३८)

२०१०: तारा वनारसे (रिचर्डस) - लेखिका

१९७०: नोली सॅच - जर्मन कवी आणि नाटककार नोबेल पुरस्कार (जन्म: १० डिसेंबर १८९१)-

# नातेवाईकांच्या घरी जाऊन पत्रिका देण्याचे संपले दिवस



नागपूर - काळाचा महिमा अगाध आहे. त्याच्या पोटात जे गडप होते ते पुन्हा कधी बाहेर येतच नाही. मग त्या प्रथा, परंपरा असोत की अन्य काही. आता हेच बघाना, लग्नपत्रिकांची छपाई आणि वितरण हा विवाह सोहळ्याचा अविभाज्य घटक. नातेवाईकांची यादी तयार केल्यानंतर मिळेल त्या साधनाने गावोगावी पोहोचविणे जिकरीचे काम होते. त्यात वेळही फार जायचा.

पण, आता सोशल मीडियाचा जमाना आला. अवघ्या काही मिनिटांमध्ये शेकडो नातेवाईकांपर्यंत पोहोचता येते. वेळ आणि खर्चाची बचत होत असली तरी लग्नपत्रिका वाटपाच्या निमित्ताने नातेवाईकांच्या घरी जाऊन ख्यालीखुशाली जाणण्याचे, मुक्काम करण्याचे दिवस संपले आहेत. आजच्या डिजिटल युगात आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात अमूल्य बदल घडत आहेत.

ज्या गोष्टींसाठी पैसा आणि वेळ विनाकारण वाया जातो, अशा अनेक गोष्टी आता तंत्रज्ञानाचा वापर करून चुटकीसरशी होत आहेत. यात सर्वच प्रकारच्या कार्यक्रमांचे निमंत्रण देण्याच्या प्रथेचा समावेश आहे. धूमधडाक्यात होणाऱ्या लग्न समारंभाचा महत्त्वाचा भाग म्हणजे लग्नाच्या निमंत्रण पत्रिका वितरित करणे. त्यासाठी खूप धावपळ करावी लागायची. नंतर मुहूर्त आणि त्यानंतरच लग्नपत्रिका तयार करण्याचे काम वधू-वराकडील मंडळींना असायचे.

काही वर्षांपूर्वी मुला-मुलींचे वडील लग्नपत्रिका नातेवाईक, स्नेही, आप्तजनांना देण्यासाठी प्रत्येकाच्या घरी जात होते. मात्र, आता मोबाईलवरून व्हॉट्स ॲप, फेसबुक यावरूनच निमंत्रण देण्याचा संदेश टाकला जातो. या नव्या पद्धतीमुळे घरोघरी जाऊन निमंत्रण देण्याची प्रथा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

# मोदींच्या पक्षात देशाच्या ऐक्याचा विचार नसल्याने भाजपच्या आसपासही जाणार नाही



हडपसर - नेहरू - गांधी कुटुंबांने या देशाची सेवा केली आहे. देशासाठी प्राणाची आहुती दिली आहे. ते हयात नसताना पंतप्रधान त्यांच्यावर टीका करीत आहेत, हे योग्य नाही. त्यामुळे मला मोदींना एकच प्रश्न विचारायचा आहे की, तुम्ही स्वातंत्र्याच्या आगोदर किंवा नंतर गांधी घराण्याच्या एक टक्का तरी योगदान दिले आहे का?

देशात सध्या हुकूमशाहीचे चित्र असून मोदींच्या पक्षात देशाच्या ऐक्याचा विचार नाही. त्यामुळे या पक्षाच्या आसपासही जाणार नसून आम्ही त्यांनाच सत्तेतून बाहेर काढणार आहोत, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला.

शिरूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ हडपसर माळवाडीरोड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या सभेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

माजी मंत्री विश्वजीत कदम, बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार महादेव बाबर, जगन्नाथ शेवाळे, जयदेव गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, तसेच समीर तुपे, प्रवीण तुपे, दिलीप तुपे, निलेश मगर, अंकुश काकडे, हेमलता मगर, योगेश ससाणे, विजय देशमुख, संजय शिंदे, अभिजीत शिवरकर आदी यावेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले, "स्वातंत्र्यपूर्व काळात पंडित नेहरू यांना तेरा वर्षे तुरूंगवास भोगावा लागला. देशाची सेवा करताना इंदिरा गांधी व त्यांचे चिरंजीव राजीव गांधी यांची हत्या झाली. स्वातंत्र्यानंतर त्यांनी लोकशाही प्रशासन येण्याकरिता विशेष कामगिरी केली. आता ते हयात नसताना त्यांच्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी टीका करत आहेत, हे योग्य नाही.

यापूर्वी झालेले पंतप्रधान सभा घेताना त्यांच्या भाषणामध्ये देशाच्या विकासाचा मुद्दा असे. आतापर्यंत काय केले आणि पुढे काय करणार याबाबत सांगितले जायचे. मात्र सध्याच्या पंतप्रधानांकडे सांगण्यासारखं काही नसल्याने दहा वर्ष सत्तेवर नसलेल्या काँग्रेसवर केवळ टीका करून प्रचार करत आहेत.

राज्याची निवडणूक सात टप्प्यांमध्ये कशासाठी, इलेक्शन कमिशनचा हा निर्णय संशय निर्माण करणारा आहे. पिडीसी बँकेची शाखा रात्री उघडी राहणं हे निवडणुकीत कधी घडलं नव्हतं, ते राज्यात घडलं आहे. पंतप्रधानांना राज्यात ज्या सभा घ्याव्या लागत आहेत, त्यावरून परिस्थिती लक्षात येत आहे.

राहुल गांधींनी संपूर्ण देशाचा दौरा करून सर्व घटकातील लोकांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत. या देशात गांधीचा विचार रुजवला पाहिजे. विरोधात जाणाऱ्या चांगल्या लोकांना तुरुंगाची भिती दाखवली जात आहे. केजरीवालांचे काम पाहण्यासाठी बाहेरच्या देशातून लोक येत आहेत. त्यांनाही या हुकूमशाहीला सामोरे जावे लागले आहे. ही हुकूमशाही येऊ नये, असे वाटत नसेल तर मतदारांनी जागृत असले पाहिजे.

हडपसर भागाला एक सांस्कृतिक आणि वैचारिक इतिहास आहे.

# सूर्यास्ताच्या साक्षीने कोल्हापुरात परशुराम जयंती; पालखी मिरवणूक उत्साहात



कोल्हापूर : कोल्हापुरात आज परशुराम जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. समस्त ब्राह्मण समाज आणि संस्थांच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी पेटाळा येथून श्री परशुराम पालखी मिरवणूक काढण्यात आली. या पालखीचे पुजन पोलीस अधिक्षक महेंद्र पंडीत यांच्या हस्ते आणि ब्रह्मवृदांच्या मंत्रोपचारात करण्यात आले. ब्राह्मण समाजातील सुमारे ३ हजार बंधु-भगिनी या सोहळ्यात सहभागी झाले होते.

मिरवणूकीच्या अग्रभागी पारंपारिक वेशभुषा, भगव्या टोप्या वस्त्र परिधान करुन बंधुभगिनी सहभागी झाले होते. त्यानंतर तरुणांची दुचाकी रॅली, पारंपरिक वाद्याचे पथक, चित्ररथ, लेझीम पथक, वारकरी मंडळाचे पथक अग्रभागी होते. श्रींच्या पालखीपुढे सतत मंत्रोपचार करणारे पुरोहीत पायी चालत होते.

पालखी मिरवणूक खरी कॉर्नर, बिनखांबी गणेश मंदीर, ताराबाई रोड, निवृत्ती चौक मार्गे पुन्हा पेटाळा मैदान येथे पोहोचली. यावेळी भगवान परशुरामांचा जयघोष करण्यात आला सायंकाळी ६.५५ वाजता मुहूर्तावर श्रींचा पाळणा सोहळा, सुंठवडा वाटप करण्यात आले. पौरोहीत्य प्रसाद निगुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दरम्यान, समस्त ब्राह्मण समाजातर्फे कत्यायनी येथील श्री परशुराम मंदीरा तसेच कोल्हापूर चित्पावन संघामध्येही श्री परशुराम मूर्तीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# वन्यजीवतस्करांच्या मुसक्या आवळणार 'हा' सायबर सेल



नागपूर : वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक सह्याद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर अंतर्गत अवैध शिकारी व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर अंतर्गत कोल्हापूर वन्यजीव वनवृत्तांमध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती प्रमाणे सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूरमध्ये सायबर सेल स्थापन करण्यात आला असल्याची माहिती विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) एस.एस. पवार यांनी दिली.

वन्यजीव व वनगुन्हे यांना आळा घालण्यासाठी संशयित आरोपी यांच्यावरील आरोप सिद्ध होण्यासाठी सी.डी.आर. एस.डी.आर एल.टी.एल. टी.डी.डी या कार्यालयाकडे अधिकृतपणे मागविण्यात आलेली माहिती गोपनीय पद्धतीने संबंधित मागणी करण्याऱ्या विभागाला पुरविण्यात येणार असून त्याचा फायदा अवैध शिकारी व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी तसेच तपास करण्यासाठी वनविभागाकडील क्षेत्रीय कर्मचारी-अधिकारी यांना होणार आहे. सायबर सेलचे उद्घाटन कोल्हापूर सह्याद्री व्याघ्र राखीवचे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक आर. एम. रामानुजम यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

सायबर सेल स्थापनेसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (बनबल प्रमुख) शैलेश टेंभुर्णीकर, महाराष्ट्र राज्य, नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता महाराष्ट्र राज्य, नागपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले असून या सायबर सेलव्दारे क्षेत्रीय कर्मचारी यांना वने व वन्यजीव विषयक गुन्हे हाताळणे व आरोपीच्या विरोधात पुरावे गोळा करणे व राज्याबाहेरील आरोपींनाही पकडणे सोईचे होणार आहे.

सायबर सेलच्या माध्यमातून वने व वन्यजीव गुन्ह्यामधील आरोपींना शिक्षा होण्यास मदत मिळणार असून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना त्याचा अधिकचा फायदा होऊन त्यांचे मनोबल वाढणार आहे. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक आर.एम. रामानुजम यांनी सायबर सेल सह्याद्री व्याघ्र राखीव कोल्हापूरसाठी काम करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या व अधिक तत्परतेणे व परिणामकरित्या कार्य करुन वने व वन्यजीव विषयक अपराधांवर आळा घालण्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपवनसंरक्षक (प्रादेशिक) जी. गुरुप्रसाद, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) एस.एस. पवार, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी एस.डी. गवते तसेच वनविभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

## Lok Sabha Elections 2024

# This time in Mumbai, Marathi vote holds key



Mumbai : For the first time in the past 15 years, the election has pivoted towards Marathi votes, with prominent parties granting tickets to 10 Marathi candidates out of 12. While MVA is vying for all six seats with Marathi candidates, Mahayuti has put forward four. In 2009 and 2014, only six candidates (50 per cent) were Marathi; in 2019, seven Marathi candidates contested in the national polls. According to data, Marathi voters comprise 37 per cent of Mumbai's electorate.

In Mumbai, there are six Lok Sabha seats, with a direct contest between Maha Vikas Aaghadi and MahaYuti. With the exception of the North and North East constituencies, all four remaining seats will witness battles between Marathi candidates. Piyush Goyal in the North and Mihir Kotech in the North East are the sole non-Marathi contenders in the primary fray.

The splitting of Shiv Sena has already made an impact on the vote bank. Even the entry of MNS into Mahayuti at the last moment underlines the importance of the Marathi vote bank in this election. Congress, which previously adopted a mix of Marathi and non-Marathi candidates, has now allocated both tickets to Marathi candidates. Meanwhile, the BJP unveiled both non-Marathi candidates in the initial list for Maharashtra candidates in March. Subsequently, the party attempted to restore balance by nominating a Marathi candidate, aiming to prevent any polarisation of votes based on language.

"There isn't a Marathi vs. Non-Marathi issue. It's a conspiracy by UBT Sena to propagate mass delusion. We won't tolerate injustice against Marathi people, while simultaneously ensuring fair treatment for Gujarati constituents. Whenever nationalist sentiments rally behind Modi and BJP, UBT Sena attempts to fragment the votes," remarked Ashish Shelar, President of Mumbai BJP.

Political analyst Prakash Akolkar said, "The outcome of the Mumbai region's election significantly hinges on Marathi votes. In this election, the deliberate allocation of tickets aimed to fragment or polarise Marathi votes. Even the Congress's decision to field a Marathi candidate in the North constituency stands out as somewhat unusual."

The splitting of Shiv Sena has already made an impact on the vote bank. Even the entry of MNS into Mahayuti at the last moment underlines the importance of the Marathi vote bank in this election. Congress, which previously adopted a mix of Marathi and non-Marathi candidates, has now allocated both tickets to Marathi candidates. Meanwhile, the BJP unveiled both non-Marathi candidates in the initial list for Maharashtra candidates in March. Subsequently, the party attempted to restore balance by nominating a Marathi candidate, aiming to prevent any polarisation of votes based on language.

### Marathi Vs Gujarati

■ Though the issue was raised by MNS and Shiv Sena in the past, Congress never took part in the controversy. This time MNS and Shinde Sena, which are along with BJP, didn't utter a word on the issue and instead, Mumbai Congress Chief has supported Marathi in the city.

### Entry of MNS, but no ticket

■ Entry of MNS at the last moment underlined the fact that the election is based on fetching Marathi votes. MNS had fetched over lakhs of votes in every constituency in 2009 resulting in the loss of all six candidates of Sena-BJP. In 2014, the votes were reduced to half, and MNS stayed out of the election in 2019. MNS has a base of Marathi voters. But there isn't a single candidate of the party in the election.

# Redevelopment projects, pollution control focal points in densely populated Mumbai South Central seat



Mumbai | Mumbai South Central is a diverse constituency, encompassing a populace representing various socio-economic strata, ranging from affluent neighbourhoods to middle-class localities and densely populated slums. While pollution and inadequate housing for the underprivileged are persistent challenges across Mumbai, the densely packed nature of this constituency exacerbates these issues, making pollution control and improved housing standards the focal points in the Lok Sabha campaigns of major political parties.

Since 1989, the Shiv Sena has maintained a stronghold over the constituency, clinching victory in this seat eight times out of the last nine elections. However, the split in the party has prompted both factions to intensify efforts to secure their support base, with incumbent Shiv Sena MP Rahul Shewale contesting against Shiv Sena UBT candidate Anil Desai.


Infrastructure development's impact on the lives of the city's working-class residents emerges as a primary concern for the electorate. Many fear that the displacement due to ambitious projects like the redevelopment of Dharavi, which, according to some, threatens their way of life.

"Dharavi has a total area of 600 acres. But for rehabilitation, the developer is seeking to acquire land almost double the size with 820 acres in Govandi, 64 acres in Mulund and 360 acre of salt pan land. This has led to major fear of displacement among locals from Dharavi. All other concerns with the redevelopment plans begin thereafter," said Raju Korde, founder-member of Dharavi Redevelopment Committee, highlighting the apprehension, citing concerns over land acquisition and the potential displacement of locals.

Similar sentiments resonate across other slum areas within the constituency such as Chembur, Anushakti Nagar and Govandi. Siddharth Colony in Chembur, embroiled in redevelopment disputes, faces an uncertain future. Ram Khare, member of the Siddhartha Colony Ghar Hakka Sangharsha Samiti, is sceptic about the efficacy of redevelopment projects, emphasising their delayed implementation and inadequate facilities.

"Many of the slum rehabilitation projects that have come up are nothing but vertical slums. On the contrary, we have seen tall-posh-towers being built fast on acquired lands which have all the amenities and are sold at premium rates. Almost no care is taken to ensure that the poor have access to decent housing," Ram Khare, member of the Siddhartha Colony Ghar Hakka Sangharsha Samiti said. He added that while issues around redevelopment are highlighted around elections, they continue to remain unaddressed after the elections.

# Dapoli resort: Anil Parab 'aide' apologises to Bombay HC, says will raze unauthorised portion in 10 days



Dapoli | Sadanand Kadam, alleged to be a close aide to the Shiv Sena's (UBT) Maharashtra Legislative Council member Anil Parab, has apologised to the Bombay High Court for not complying with a March 18 order to demolish an unauthorised portion of the Sai Resort in Dapoli and said he will raze it within 10 days.

Kadam, through advocate Saket Mone, stated on Friday that there was some delay as the demolition of the second floor of the structure in Ratnagiri district was taking time owing to several difficulties.

Kadam, who was present in the court, also said he would bear the expenses for demolishing the unauthorised portion, which is in violation of a September 12, 2017, order of the Dapoli subdivisional officer.

It was alleged that the previous owner of the Dapoli property was granted permission to construct a ground-plus-one-floor structure on the piece of land. However, Kadam allegedly constructed more floors without permission. It was also alleged the entire plot on which the resort was constructed was in Coastal Regulation Zone III, a no-development zone, and that no clearance was secured from the department or the ministry concerned for such construction. On March 18, the court accepted Kadam's undertaking and directed him to demolish the portion by April 15, 2024. However, it was extended till the ad interim relief concerning the part which was not in violation of the 2017 permission. The court had made clear that if the undertaking was not complied with, apart from other actions, Kadam would be liable for action under the Contempt of Courts Act.

On April 17, Kadam informed the court that he had complied with his undertaking to demolish the portion.

On May 10, a single-judge bench of Justice Madhav Jamdar accepted his apology for non-compliance as the second floor of the structure was yet to be demolished.

The court passed an order on Kadam's plea challenging a 2023 demolition notice issued by the subdivisional officer.

A complaint was filed by the Union environment ministry against Parab, Sai Resort, Sea Conch Resort and others before the judicial magistrate in Dapoli for violation of provisions of the Environment (Protection) Act 1986.

Based on the complaint, the Enforcement Directorate registered a money-laundering case and arrested Kadam on March 10, 2023. He was released on bail in February this year.

An FIR was also registered in this regard at the Dapoli police station for allegedly deceiving and causing loss to the state government.

## थोडक्यात

### रेल्वेच्या दरवाजात लटकून प्रवास करणं बेतलं जीवावर



● मुंबई, प्रतिनिधी :

उन्हाळी सुट्ट्यांमुळे मुंबईहून सुटणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांना गर्दी वाढत आहे. रस्तेमार्गे कोकणात पोहोचणे अधिक खर्चिक व वेळखाऊ असल्याने, कोकणवासी रेल्वेला प्राधान्य देतात. प्रचंड गर्दी असलेल्या कोकणकन्या एक्स्प्रेसमधून लटकत प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा तोल जाऊन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली आहे. अमित पवार असे या प्रवाशाचे नाव आहे. धोका पत्करूनही रेल्वेने प्रवास करू नये, असे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे.

मूळचे सिंधुदुर्ग येथील अमित पवार हे कांदिवलीतील चारकोप परिसरात वास्तव्यास होते. कोकणातील गावी जाण्यासाठी गुरुवारी त्यांनी कोकणकन्या एक्स्प्रेसचा पर्याय निवडला. आरक्षण पूर्ण झाल्याने त्यांनी जनरल डब्यातून प्रवास करण्याचा निर्णय घेतला. मात्र जनरल डब्यात प्रचंड गर्दी असल्याने, त्यांना डब्यात प्रवेश करता आला नाही. त्यामुळे जनरल डब्याच्या दरवाजावरील पायदानावर लटकत प्रवास करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मात्र दादर स्थानकातील फलाट क्रमांक११वरून गाडीने वेग घेताच त्यांचा तोल गेला, ते फलाटाच्या टोकावर पडले आणि गाडीच्या चाकाखाली सापडले. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला.

गुरुवारी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास कोकणकन्या एक्स्प्रेसमधील जनरल डब्यातून प्रवास करत असताना तोल गेल्याने प्रवाशाचा अपघाती मृत्यू झाला आहे. या प्रकरणी दादर रेल्वे पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती दादर रेल्वे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल कदम यांनी केले आहे.

### मतदान करा फुल, नाशिक करा कुल ! नाशिकमधील पर्यावरणप्रेमींचा अनोखा जाहिरनामा



● नाशिक, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणूक म्हंटली की, राजकीय पक्ष आणि उमेदवार आपला जाहिरनामा तयार करतात. मात्र, नाशिकमधीलपर्यावरण प्रेमींनी अनोखा पर्यावरण जाहिरनामा तयार केला आहे. लोकसभा निवडणूकीच्या धामधुमीत त्याचा प्रचार सुरू करण्यात आला असून निवडणूकीतील उमेदवारांना तो सादर केला आहे.'मतदान करा फुल, नाशिक करा कुल' असे ब्रिद प्रचारासाठी ठेवण्यात आले असून त्या निमित्ताने मतदानासंदर्भात जागृती देखील केली जात आहे. कधी काळी थंड हवेचे ठिकाण मानल्या जाणाऱ्या नाशिकमध्ये आता तापमान चाळीशी पार जात असून कमाल तापमानाचे उच्चांक प्रस्थापित केले जातात. त्या पाश्व'भूमीवर नाशिकमधील पर्यावरण प्रेमींनी हा जाहिरनामा केला आहे. यात नदीच्या संवर्धनासाठी पूररेषेत कोणतीही बांधकामे होऊ देऊ नयेत, डोंगरांवर वृक्षारोपण करावे, प्रादेशिक गौवंश जगवून प्रदूषण मुक्त, विषमुक्त शाश्वत ग्रामविकासासाठी प्रयत्न करावेत, शिवकालीन गड किल्ले आणि डोंगर यांचे संवर्धन करावेत अशा प्रकारच्या मागण्या जाहिरनाम्यात आहेत. नाशिक लोकसभामतदार संघातील अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराज यांना शनिवारी हा जाहिरनामा देण्यात आला. यावेळी निशिकांत पगारे , मनीष बाविस्कर , योगेश बर्वे , सुनिल परदेशी आदी उपस्थित होते.

# 'मोदी देशाचं नेतृत्व करत राहतील यात कन्फ्यूजन नाही'– अमित शाह



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तेलंगणा दौऱ्यावर आहेत. शनिवारी त्यांनी एका रॅलीला संबोधित केलं आणि नंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी भाजपा तेलंगणात 10 पेक्षा जास्त जागा जिंकेल असा दावा अमित शाह यांनी केला.

अरविंद केजरीवाल यांच्या टीकेवर ते म्हणाले की, 'पंतप्रधान मोदी हा कार्यकाळ पूर्ण करतील आणि देशाचे नेतृत्व करत राहतील.' 'बघा, मी अरविंद केजरीवाल अँड कंपनी आणि संपूर्ण इंडिया आघाडीला सांगू इच्छितो की, मोदीजी 75 वर्षांचे होतील याचा आनंद होण्याची गरज नाही. हे भारतीय जनता पक्षाच्या घटनेत कुठेही लिहिलेले नाही. मोदीजीच हा कार्यकाळ पूर्ण करतील आणि मोदीजीच देशाचं नेतृत्व करत राहतील. यावरून भाजपामध्ये कोणतंही कन्फ्यूजन नाही.

आप कार्यालयात पत्रकार परिषदेला संबोधित करताना केजरीवाल म्हणाले होते की, 'मोदीजी पुढील वर्षी 17 सप्टेंबर रोजी 75 वर्षांचे होत आहेत. 2014 मध्ये मोदीजींनी असा नियम केला होता की, भाजपामध्ये जे 75 वर्षांचा असतील त्यांना निवृत्त केलं जाईल, आधी लालकृष्ण अडवाणी निवृत्त झाले, नंतर मुरली मनोहर जोशी, सुमित्रा महाजन, यशवंत सिन्हा निवृत्त झाले.

'आता मोदीजी पुढच्या वर्षी 17 सप्टेंबरला निवृत्त होणार आहेत. मला भाजपाला विचारायचं आहे की, तुमचा पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण आहे? जर यांचे सरकार स्थापन झाले, तर मोदीजींचे सर्वात महत्त्वाचे व्यक्ती अमित शाह यांना पंतप्रधान करतील. मोदीजी स्वतःसाठी नाही तर अमित शाह यांच्यासाठी मत मागत आहेत.' यावर आता अमित शाह यांनी पलटवार केला आहे.

# मतदानाचा हक्क बजावण्याची संधी मिळावी आणि ७०० रुपये मानधन देण्यात यावे

## आशा वर्कर्स युनियनची मागणी



● पुणे, प्रतिनिधी :

मतदानाच्या दिवशी (१३ मे) मतदान केंद्रांवर महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून ७९६ आरोग्य सेवक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे आशा वर्कर यांचे असून, त्यांना केवळ २०० रुपये मानधन न देता ७०० रुपये मानधन देण्यात यावे, अशी मागणी आशा वर्कर्स युनियन, पुणे जिल्हा (सीटू) यांनी केली आहे.

याबाबत युनियनचे सचिव किरण मोघे म्हणाले, १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत आशा वर्कर यांनी मतदान केंद्रांवर सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित राहण्यासाठी पुणे महापालिकेने आज्ञापत्र काढले आहे. त्यासाठी त्यांना १२ तासांच्या कामासाठी केवळ २०० रुपये मानधन दिले जाईल, असे तोंडी सांगितले आहे. तसेच वेगळा प्रवास भत्ता किंवा जेवणाची व्यवस्था केलेली नाही.


दरम्यान, आशा वर्कर यांना सध्या कोणतीच वेतन श्रेणी लागू नाही. तसेच अनेक आशा वर्कर यांची निवासापासून लांबच्या मतदान केंद्रांवर नियुक्ती केली गेली आहे. त्यासाठी त्यांना प्रवास खर्चासाठी बरीच पदरमोड करावी लागणार आहे. आशा वर्कर त्यांना त्यांच्या कामावर आधारित मोबदला मिळत असल्याने, त्या दिवशी त्यांना त्यांचे काम करता येणार नाही आणि त्यांचा मोबदला देखील मिळणार नाही. विशेष म्हणजे काही आशा वर्कर यांचे स्वतःचे मतदान १३ मे रोजीच आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचा मतदानाचा अधिकार कसा बजावायचा याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

ज्या आशा वर्कर यांच्या घरात अपंग किंवा वृद्ध व्यक्तींची सेवा, स्वतःचे आजारपण अशी समस्या असेल त्यांना या कामातून सूट देण्यात यावी, अशी मागणी युनियनने जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक अधिकारी पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे मोघे यांनी सांगितले.

# अन्य गुन्ह्यांचाही लवकर उलगडा होवो!

## डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी छगन भुजबळ यांचे विधान

● नाशिक, प्रतिनिधी :



डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी दोघांना आजन्म जन्मठेप आणि तिघांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता झाली आहे. तब्बल ११ वर्षांनी हा निकाल लागलेला आहे. दाभोलकर यांच्यासह पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश या तिन्ही हत्या लिंक्ड असण्याची शक्यता फार पूर्वीपासून माध्यमांतून व्यक्त होत आहे. त्यामुळे त्या गुन्ह्यांतील गुन्हेगारांचाही लवकर उलगडा होऊन न्यायदेवतेकडून त्यांना शिक्षा व्हावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असल्याचे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी सांगितले.

दाभोलकर हत्या प्रकरणातील आरोपींना न्यायालयाने शिक्षा जाहीर केल्यानंतर भुजबळ हे पत्रकारांशी बोलत होते. दाभोलकर प्रकरणातील आरोपीच प्रदीर्घ काळ सापडत नव्हते. त्यानंतर काही सापडल्यावर मग त्यातील दोघांना जन्मठेप झाली असली तरी तिघे पुराव्याअभावी निर्दोष सुटलेले आहेत. दाभोलकर यांच्याप्रमाणेच पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश हे अंधश्रद्धा आणि समाजातील अयोग्य बाबींवर बोलणारी समाजसुधारक मंडळी होती. अंधश्रद्धेविरोधात पावले उचलावीत, कायदे करावेत अशा मागण्यादेखील त्यांनी वारंवार केल्या होत्या.त्यानंतर राज्य शासनाने तशा स्वरूपाचा कायदादेखील केला. तो कितपत प्रभावी आहे किंवा नाही हा मुद्दा वेगळा असला तरी तो कायदा त्यांच्यासारख्या समाजसेवकांच्या जनरेट्याने झाला. त्या चौघांच्या हत्या या एकमेकांशी लिंक्ड असल्याचे त्यावेळी वर्तमानपत्रांमधून येत होते. मात्र, त्याबाबत लवकर गुन्हेगारांची उकल होऊन त्यांना शिक्षा व्हावी, हीच जनसामान्यांची इच्छा असल्याचेही भुजबळ यांनी नमूद केले.

# बिबट्याला जेरबंद करतेवेळी फेकले दगड, नागरिकांना अतिरेक पडला महागात

● नाशिक, प्रतिनिधी :



इगतपुरी तालुक्यातील उंबरकोन शिवारात चोवीस तासांपासून बिबट्याला जेरबंद करण्याचे शर्थीचे प्रयत्न अयशस्वी होत आहेत. त्यामुळे चवताळलेल्या बिबट्याने केलेल्या हल्ल्यात पाच वनरक्षकांसह सहा ते सात नागरिक जखमी झाले. गंभीर बाब म्हणजे, धावणाऱ्या नागरिकांवर चवताळलेल्या बिबट्याने हल्ला केला. वन मंत्रालयापर्यंत घटनेची माहिती पोहोचल्याने नाशिक वनवृत्तातील सर्व पथके इगतपुरीत दाखल झाली आहेत.

उंबरकोन येथील म्हसोबा शिवारात गुरुवारी (दि. ९) सायंकाळी आई-वडिलांसोबत शेतात जाणाऱ्या १२ वर्षीय पवन सूर्याजी सारुकते याच्यावर बिबट्याने हल्ला केला. त्याला घोटीच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वन विभागाने त्वरित धाव घेत बिबट्याला जेरबंद करण्याचे प्रयत्न सुरू केले. शुक्रवारी (दि. १०) पहाटेपर्यंत शोधमोहीम राबविल्यावर सकाळी पिंजरे तैनात करण्यात आले. त्यावेळी दडी मारून बसलेल्या बिबट्याने पुन्हा दोन नागरिकांवर हल्ला केला. वन विभागाच्या बचाव पथकावरही बिबट्या धावून गेला. त्यात पाच वनरक्षकांसह एक अधिकारी जखमी झाला. एका वनरक्षकाच्या जीभेवर बिबट्याचे नख लागल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. या सर्वांना नाशिक जिल्हा रुग्णालयासह खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, आमदार हिरामण खोसकर यांनी ग्रामस्थांची भेट घेत रुग्णालयात जखमींची विचारपूस केली. वन मंत्रालयात यासंदर्भात 'अलर्ट' मिळाल्यानंतर नाशिकच्या सर्व पथकांना घटनास्थळी रवाना होण्याचे आदेश देण्यात आले. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत बिबट्याचा धुमाकूळ सुरूच होता. मात्र, बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाच्या पथकाला यश आले नाही.

बिबट्याला पकडण्यासाठी 'रेस्क्यू टीम' प्रयत्न करीत असताना काही नागरिकांनी बिबट्याच्या दिशेने दगड फेकले. त्यामुळे बिबट्या बिथरला आणि त्याने थेट नागरिकांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. नागरिकांच्या अतिरेकामुळे बिबट्या बिथरून अनर्थ घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

वनपरिमंडळ अधिकारी भाऊसाहेब गणपत राव यांच्यासह वनरक्षक फैजअली जाफरअली सय्यद, गोरख देवराम बागूल, चिंतामण देवराम गाडर, विठ्ठल पुंडलिक गावंडे हे जखमी झाले. तसेच कार्तिक मोहन सारुकते (वय २५), सतीश विष्णू सारुकते (३५) व किसन गोविंद सारुकते (४५) हे तीन नागरिक जखमी झाले. मुख्य वनसंरक्षक ऋषिकेश रंजन, उपवनसंरक्षक पंकज गर्ग, सहायक वनसंरक्षक अनिल पवार यांनी सर्व जखमी अधिकारी-कर्मचाऱ्यांसह नागरिकांची विचारपूस केली. यासह आरोग्य यंत्रणेला सूचना केल्या.

# शहीद हेमंत करकरे यांच्या संदर्भातील वक्तव्यावरून विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत अदखलपात्र गुन्हा दाखल

● नागपूर, प्रतिनिधी :

काँग्रेसचे नेते व विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शहीद आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून राजकारण तापलेलेच असताना पोलिसांनी त्यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

सीताबर्डी पोलीस ठाण्यात वडेट्टीवार यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत हा अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. भाजपतर्फे पोलीस ठाणे व निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती.

भाजपच्या विधि सेलचे महानगर अध्यक्ष ॲड. परीक्षित गजानन मोहिते यांनी मागील आठवड्यात तक्रार केली. तक्रारीनुसार वडेट्टीवार यांनी करकरे यांच्या मृत्युमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचा हात असल्याचा आरोप केला होता. भाजप व भाजपचे उमेदवार उज्ज्वल निकम देशद्रोही असल्याचा आरोपदेखील वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार यांनी असे वक्तव्य करून आचारसंहितेचा भंग केला असून,



समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. विजय वडेट्टीवार यांचे वक्तव्य तथ्यहीन असून, न्यायालयाचादेखील अवमान करणारे आहे अशी भूमिका भाजपकडून घेण्यात आली होती. भाजपकडून निवडणूक आयोगातदेखील तक्रार दाखल करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय बोकाडे यांनी वडेट्टीवार यांच्या विरोधात सीताबर्डी पोलिस ठाण्यात तक्रार केली. त्याआधारे पोलिसांनी वडेट्टीवार यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# राजन साळवी मुख्यमंत्र्यांच्या संपर्कात, किरण सामंतांचा गौप्यस्फोट



● रत्नागिरी, प्रतिनिधी :

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी मतदान झाल्यानंतर आता ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी आणि शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांचे ज्येष्ठ बंधू किरण उर्फ भैय्या सामंत यांच्यातील वाद रंगला आहे. किरण सामंत यांनी राजन साळवी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा गौप्यस्फोट केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

मला खासदार करायचे की नाही याचा निर्णय महायुती घेईल. मला खासदार बनवायला शिंदे, फडणवीस सक्षम आहेत. राजन साळवींनी माझी काळजी करण्यापेक्षा आपल्या आमदारकीची चिंता करावी, असं वक्तव्य शिवसेनेचे किरण सामंत यांनी केले आहे. किरण सामंत यांचे कोकणात चांगले काम असून त्यांचा जनसंपर्क देखील दांडगा आहे. त्यामुळे अशा नेत्याला महाविकास आघाडीकडून राज्यसभेवर जाण्याची संधी मिळेल, असं वक्तव्य आमदार राजन साळवी यांनी दोन दिवसांपूर्वी केले होते. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना चांगलेच उधाण आले होते. आता मात्र राजन साळवींच्या वक्तव्यावर किरण सामंत यांनी रोखठोक प्रतिक्रिया देत आमदार राजन साळवी यांना मित्रत्वाचा सल्ला दिला आहे. भविष्यात लांजा राजापूर मतदारसंघ महाआघाडीकडून काँग्रेसच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे राजन साळवींनी प्रथम आपली आमदारकी वाचवावी असा सल्ला किरण सामंत यांनी दिला आहे.

भविष्यात मी निवडणूक लढवली तर धनुष्यबाण याच चिन्हावर लढवेन. राजन साळवी हे सातत्याने एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात आहेत याची मला कल्पना आहे. त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे शिवसेनेत प्रवेश न केल्यास मी स्वतः लांजा राजापूर मतदारसंघातून धनुष्यबाण या चिन्हाचा उमेदवार असेन असा इशारा देखील किरण सामंत यांनी राजन साळवी यांना दिला आहे.

# छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाच्या जवानांची मोठी कारवाई

## भीषण चकमकीत 12 माओवाद्यांना कंठस्थान

● गडचिरोली, प्रतिनिधी :



छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यातील गांगलूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पीडिया जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये मोठी चकमक झालीय. या चकमकीत सुरक्षा दलाच्या जवानांनी 12 नक्षलवाद्यांचा खात्मा केलाय.

तसेच पीडिया जंगलात माओवाद्यांनी उभारलेला तात्पुरता तळ उद्धवस्त करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना मोठे यश आले आहे. या कारवाई मध्ये पोलिसांनी घटनास्थळावरुन मोठ्याप्रमाणात स्फोटके आणि इतर वस्तू जप्त केल्या आहेत. तर भूसुरुंग स्फोटामुळे दोन जवान जखमी झाल्याची माहितीही समोर आली आहे.

देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठा घातपात करण्याचा उद्देशाने नक्षलग्रस्त भागात गेल्याकाही दिवसांमध्ये नक्षलवाद्यांचा वावर वाढला असल्याचे समोर आले आहे. या नक्षलवाद्यांच्या कारवाई विरोधात पोलिसांनी देखील आपली कंबर कसली असून प्रत्येक बारीक सारिक गोष्टींकडे पोलीस लक्ष देऊन आहे. अशाच एका मोठ्या कारवाईत सुरक्षा दलाच्या जवानांना मोठे यश आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या माओवादी विरोधी मोहिमेअंतर्गत 8 मे रोजी प्रतिबंधित सीपीआय माओवादी संघटना (PLGA) कंपनी क्रमांक 2 कमांडर वेल्ला, गांगलूर क्षेत्र समितीचे सचिव दिनेश मोदियाम आणि इतर 100-150 सशस्त्र माओवाद्यांना अटक करण्यात आली. गंगलूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पीडियाच्या जंगलात, डीआरजी विजापूर, डीआरजी दंतेवाडा, डीआरजी सुकमा, बस्तर फायटर, एसटीएफ आणि कोब्रा 210, 202, 85 सीआरपीएफ यांच्या संयुक्त पथकाने ही माओवादीविरोधी कारवाई केली होती. त्यानंतर या परिसरात शोध मोहिमेदरम्यान, 10 मेच्या सकाळी 6 वाजताच्या सुमारास पीडिया जंगलात वेगवेगळ्या ठिकाणी पोलीस आणि माओवाद्यांमध्ये चकमक झाली. बराच वेळ चाललेल्या या चकमकीनंतर घटनास्थळावरून 12 माओवाद्यांचे मृतदेह पोलिसांच्या हाती लागले. तर बीजीएल लाँचर, 12 बोअरची बंदूक, देशी बनावटीची रायफल, प्रतिबंधित माओवादी संघटनेचे प्रचार साहित्य आणि माओवादी साहित्य हे देखील घटनास्थळावरुन जप्त करण्यात आले आहेत. सध्या पोलीस या परिसरात अधिक शोध घेत आहेत.

# वसई-विरारकरांनो, पाणी जपून वापरा! धरणांतील पाणीसाठा खालावला

● वसई, प्रतिनिधी :

वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन धरणांमधील पाणीसाठा काही प्रमाणावर खालावला आहे. त्यातील पेल्हार धरणात ४५ तर, उसगाव धरणात ५५ दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. धामणी धरणातील पाणीसाठाही २५ टक्क्यांवर आला असला तरी तो वर्षभर पुरेल इतका असल्याचे पालिकेने सांगितले. उन्हाच्या वाढत्या झळा पाहता धरणातील पाणीसाठा पुढे आणखी खालावण्याची शक्यता असून पाणीटंचाईची भीती वर्तवली जात आहे.

सूर्या धरणाच्या दोन प्रकल्पांतून २०० दलली (एमएलडी) आणि तिसऱ्या प्रकल्पातून १६५ दलली पाणीपुरवठा वसई-विरार शहराला होतो. उसगाव या धरणातून २० द. ल. लि आणि पेल्हारमधून १० द. ल. लि पाणी पुरविले जात आहे. मात्र सध्या मे महिन्यात उसगाव आणि पेल्हार या धरणांतील पाण्याचा साठा खालावला आहे. उसगाव धरणात ५५ दिवस पुरेल इतका पाणीसाठा तर, पेल्हार धरणात ४५ दिवस



पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. सूर्या धरणात २५ टक्के पाणीसाठा शिल्लक असला तरी हा वर्षभर पुरणार असल्याचे पालिकेने सांगितले. मागील वर्षीही मे महिन्यात कडक उन्हामुळे धरणातील झालेले पाण्याचे बाष्पीभवन आणि दररोज पुरविण्यात येणारे पाणी यामुळे पालिका हद्दीतील उसगाव आणि पेल्हार या धरणांची पाण्याची स्थिती खालावली होती. उसगाव धरणातील पाणीसाठा ५० दिवस तर पेल्हारमध्ये ३३ दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक होता. यंदाही तीच स्थिती उद्धवली आहे.

पेल्हार धरणातून पेल्हार भाग, नालासोपारा पूर्वेकडील काही भाग आणि उसगाव धरणातून विरार पूर्वेकडील काही भागांना पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे या मे महिन्याच्या शेवटपर्यंत या भागातील पाण्याची स्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. मात्र त्यानंतर या भागाला सूर्या प्रकल्पाच्या धामणी धरणातून पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे पालिकेने सांगितले आहे. सूर्या धरणामध्ये एक वर्ष पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असला तरी कडक उन्हामुळे होणारे पाण्याचे बाष्पीभवन, पाणीगळतीची समस्या आणि अधिकचा पुरविण्यात येणारा पाण्याचा पुरवठा, पाणी चोरी यामुळेही पाण्याची पातळी खालावून उपयुक्त पाणी कमी दिवस पुरेल, अशी शक्यता आहे. दुसरीकडे धामणी (सूर्या) धरणात मुबलक पाणीसाठा असला तरीही पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

पालिका हद्दीत अनेक ठिकाणी अजूनही नळजोडण्या पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे काही भागांत पाणीटंचाई आहे. यासाठी पालिका अशा भागांत दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करते. यंदाही पाणीपुरवठा सुरू असून वसई पूर्वेचा काही भाग, कामण आणि त्या पुढील भागांत टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले.